SENSODYNE

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २६३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### पती व सासरच्या त्रासाला कंटाळून गरोदर विवाहितेची आत्महत्या



**सिल्लोड :** माहेरून फ्रुट व्यवसायासाठी सात लाख रु आन असा तगादा लावत सतत मारहाण करून मानसिक त्रास देणाऱ्या पती व सासरच्या त्रास कंटाळून विवाहितेने पाच महिन्याची गरोदर असतांना गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हर्सूल येथे घडली. आत्महत्या करणाऱ्या विवाहितेचे नाव आएशा बेगम अरबाज शेख (वय २३, रा. अजिंठा ता. सिल्लोड, हल्ली मु. हर्सूल जि. संभाजीनगर) असे आहे. सदरील आत्महत्या प्रकरणी विवाहितेची आई नूरजहाँ बेगम शेख रशीद यांनी दिलेल्या तक्रारीवरून मयत विवाहितेचा पती नामे अरबाज सलिम शेख, सासू सायरा सलिम शेख, जेठ अलिम सलिम शेख सर्व राहणार ९११ किदवई नगर नायगांव रोड, मोहम्मदीया मस्जिद जवल, भिवंडी, ठाणे या सर्व आरोपिंविरुद्ध हर्सूल पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. ती पाच महिन्याची गरोदर असतांना माझ्या मुलीने या सततच्या मानसिक शारीरिक छळाला कंटाळून २५ डिसेंबर २०२५ रोजी रात्री आत्महत्या केली असून आत्महत्येपूर्वी तिने सुसाइड नोट ही लिहिले होते. त्यात आत्महत्येस पति आणि पतिच्या कुटुंबिय छळ करत होते असा उल्लेख केला आहे. या तक्रारीवरून हर्सूल पोलीस ठाण्यात वरील आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### २०२५ च्या आठवणी आणि २०२६ साठी कलाकारांच्या सकारात्मक अपेक्षा

**छत्रपती संभाजीनगर :** २०२५ ला निरोप देत आणि २०२६ चे स्वागत करताना झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिकांमधील कलाकारांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. गेलेले वर्ष यश, अनुभव आणि संस्मरणीय क्षणांनी भरलेले ठरले असून येणारे वर्ष अधिक आनंद, शांतता आणि सकारात्मकतेने भरलेले असावे, अशी अपेक्षा कलाकारांनी व्यक्त केली. 'जागृति – एक नयी सुबह' मालिकेतील प्रमुख भूमिका साकारणारी रचना मिस्त्री हिने २०२५ हे वर्ष आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे ठरल्याचे सांगत प्रेक्षकांच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. 'जगद्धात्री' मालिकेतील शिवायची भूमिका साकारणाऱ्या फर्मान हैदरने पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त केला. 'गंगा माई की बेटियां' मालिकेतील अमनदीप सिधू हिने आपल्या मालिकेने टीआरपीमध्ये अव्वल पाचमध्ये स्थान मिळवल्याचा उल्लेख करत २०२६ हे वर्ष अधिक सकारात्मक आणि यशस्वी ठरेल, अशी आशा व्यक्त केली. नव्या वर्षाच्या निमित्ताने कलाकारांनी प्रेक्षकांना शुभेच्छा दिल्या.

### मॅरेथॉनची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदणी

**पुणे :** किसाना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी (हरि कृष्णा ग्रुप) ने किसाना डायमंड मॅरेथॉनच्या ऐतिहासिक १ व्या आवृत्तीचे यशस्वीरित्या आयोजन केले. मॅरेथॉन पुणे मधे १ आवृत्तीत पोहोचली असताना, भारतातील इतर ५६ शहरांमध्ये ज्वेलरी ब्रँडने मॅरेथॉन आयोजित करण्याची ही पहिलीच वेळ होती, ज्यामुळे हा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर एक ऐतिहासिक कामगिरी ठरला. स्वच्छ भारत, निरोगी भारत या थीम अंतर्गत देशभरातील ५७ शहरांमध्ये एकाच वेळी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता आणि अधिकृतपणे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रयत्न म्हणून त्याची नोंदणी करण्यात आली होती. मुंबईत ५,००० हून अधिक सहभागींसह देशभरातून २०,००० हून अधिक धावपटूंनी या कार्यक्रमासाठी नोंदणी केली. ५ किमी, १० किमी आणि २१ किमी शर्यती मुंबईत आयोजित करण्यात आल्या, तर इतर शहरांमध्ये ५ किमी शर्यती सकाळी ७ वाजता एकाच वेळी सुरू झाल्या.

### आतडयांना बसलेल्या जीवघेण्या पिळ्यातून नवजात बाळाला जीवनदान

**अहिल्यानगर :** मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील डॉक्टरांनी इंटेस्टाइनल मॅलरोटेशन विथ मिडगट व्हॉल्व्युलस या दुर्मिळ आणि जन्मजात आतड्यांच्या गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या केवळ ३ दिवसांच्या नवजात बाळावर यशस्वी उपचार केले. हा आजार वेळेत उपचार न झाल्यास काही तासांत जीवघेणा ठरू शकतो. लक्षणांची लवकर ओळख, तातडीची तपासणी आणि योग्य वेळी करण्यात आलेली शस्त्रक्रिया यामुळे बाळाचे प्राण वाचवणे शक्य झाले.हे बाळ मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथेच जन्माला आले होते आणि सुरुवातीला त्याची प्रकृती स्थिर होती. मात्र दुसऱ्या दिवशी बाळाला दूध पिण्यात अडचण येऊ लागली आणि प्रत्येक फीडनंतर उलट्या होऊ लागल्या. ही धोक्याची चिन्हे ओळखताच बालरोग तज्ज्ञांच्या पथकाने तातडीने सखोल तपासण्या सुरू केल्या.

### टोयोटा इंडियाचे ब्रँड अँबेसडर ड्रम ताओ यांनी प्रभावी ठसा उमटवला

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) चे ब्रँड अँबेसडर असलेले प्रसिद्ध जपानी परकशन एन्सेम्बल ड्रम ताओ यांनी आपला जोशपूर्ण भारत दौरा यशस्वीरीत्या पूर्ण केला. या दौऱ्याची सुरुवात शिलाँग येथील चेरी ब्लॉसम फेस्टिव्हल आणि कोहिमा येथील हॉर्नबिल म्युझिक फेस्टिव्हलपासून झाली. त्यानंतर ड्रम ताओ यांनी विजयवाडा, चेन्नई, दिल्ली, जयपूर, कोलकाता, गुवाहाटी, वाराणसी, मुंबई, पुणे आणि अंदमान द्वीपसमूहातील विविध शहरांमध्ये प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आणि बेंगळुरू येथे प्रभावी व संस्मरणीय फिनालेसह या दौऱ्याचा समारोप केला.

# बोदवडच्या व्यापाराचा चाळीसगाव घाटात आढळला मृतदेह

**तभा वृत्तसेवा,**

**अजिंठा, दि, २९ डिसेंबर :** सिल्लोड तालुक्यातील बोदवड येथील भुसार मालाचे व्यापारी तुकाराम माधवराव गव्हाणे (वय ५५ वर्ष रा.बोदवड) यांचे अपहरण करून भीषण हत्याकांड करून संपवले आहे.

शनिवारी (दि.२७ डिसेबर) रात्रीपासून बेपत्ता असलेल्या तुकाराम गव्हाणे यांचे मृतदेह सोमवारी (दि. २९ डिसेंबर) रोजी पहाटे चाळीसगाव घाटात आढळून आला .याप्रकरणी पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास चक्र फिरवून सिल्लोड तालुक्यातील विविध गावातील पाच संशयितांना ताब्यात घेतले आहे.

बोदवड येथील कृषी सेवा केंद्र चालवणारे तुकाराम गव्हाणे हे शनिवारी (दि.२७) दुपारी आपल्या दुचाकीवरून (एम.एच. २० जि.ए. ०४४३) उडणगाव येथे आले होते. तेथील एका व्यापाऱ्याकडून एक लाख रुपये घेऊन ते घराकडे परतण्यासाठी निघाले. मात्र रात्री उशिरापर्यंत घरी पोहोचले नाही. कुटुंबीयांनी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा फोन बद येत होता. त्यांचा शोध घेतला मात्र शोध लागला नाही.

**पोलिसांनी पाच संशयितांना घेतले ताब्यात!**



एक कोटीच्या खडणीचा फोन आला

दुसऱ्या दिवशी तुकाराम गव्हाणे यांचा मोबाईल वरून त्यांच्या मुलाला फोन आला माझे अपहरण झाले असून बस स्थानक परिसरात एक कोटी रुपये घेऊन ये असे त्यांनी सांगितले. त्यानंतर काही वेळेने पुन्हा काकानां फोनवरून दोन कोटीची मागणी करण्यात आली .या धक्कादायक फोनमुळे अपहरणाचा संशय बाळगला आणि कुटुंबीयांनी तातडीने अजिंठा पोलीस ठाण्यात धाव घेतली.

या घटनेचे गंभीर्याने अजिंठा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल ढाकणे, उपपोलीस निरीक्षक धम्मदीप काकडे, यांच्यासह वडोद बाजार पोलीस आणि गुन्हे शाखेचे तीन पथकांनी तपास सुरू केला सीसीटीव्ही फुटेज आणि मोबाईच्या लोकेशनच्या मदतीने तपास शोध घेत असता सोमवारी (दि.२९ डिसेंबर) रोजी पहाटे चाळीसगावच्या घाटात घाटा त्यांचा मृतदेह पोलिसांना मिळून आला पोलिसांना मिळून आला.

**पाच आरोपी पोलिसांच्या ताब्यात**

या हत्याचा छडा लावत पोलिसांनी पाच जणांना सिल्लोड तालुक्यातील विविध गावातून ताब्यात घेतले आहे .अजिनाथ उर्फ रखमाजी सपकाळ वय २२ वर्ष रा पालोद , वैभव समाधान रानगोते वय २२ वर्ष रा . गोळेगाव,सचिन नारायण बनकर वय २५ वर्षे रा . गोळेगाव, विशाल साहेबराव खरात वय २३ वर्ष रा पानवडोद, दिपक कन्हैयालाल जाधव वय २५ वर्पे रा. लिहा खेडी यांना अटक करण्यात आले असून या पाच जणांनी व्यापाऱ्यांचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह घाटात फेकून दिला होता या घटनेमुळे संपूर्ण परिसरातमोठी खळबळ उडाली असूनआत्याचे नेमके कारण काय होते याचा अधिक तपास पोलीस करत आहे.



## मुख्य संयोजकपदी आर.आर. पहाडे; सहसयोजकपदी विपीन कासलीवाल

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि, २९ डिसेंबर :** नमोकार तीर्थ, मलसाने (ता. चांदवड, जि. नाशिक) येथे दिनांक ६ ते २५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव व महामस्तकाभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आचार्य देवनंदीजी गुरुदेव ससंघ यांच्या सान्निध्यात होणाऱ्या या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर गुरुभक्त परिवारातर्फे भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण भोजन व्यवस्थेची जबाबदारी शहरातील गुरुभक्तांकडे देण्यात आली आहे.

या उपक्रमासाठी आर. आर. पहाडे यांची मुख्य संयोजकपदी, तर विपीन कासलीवाल यांची सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आयोजनाची कार्ययोजना ठरविण्यासाठी आचार्य देवनंदीजी गुरुदेव यांच्या उपस्थितीत व पंचायत माजी अध्यक्ष ललित पाटणी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी भोजन व्यवस्थेचे सुसूत्र, नियोजनबद्ध आणि उच्च दर्जाचे मॉडेल सादर करण्यात आले.

आचार्य देवनंदीजी महाराज यांनी संपूर्ण जैन समाजाला आशीर्वाद देत हा महोत्सव यशस्वी करण्याचे आवाहन केले. बैठकीस मोठ्या संख्येने गुरुभक्त उपस्थित होते. अशी माहिती प्रचारप्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

## पैठणला स्वीकृत नगरसेवक पदासाठी जोरदार तयारी



**तभा वृत्तसेवा,**

**पैठण, दि २९ डिसेंबर :** पैठण नगरपरिषद निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडकीत खासदार संदीपान भूमरे, आमदार विलास बाप्पू भूमरे यांच्या नेतृत्वाखाली एकट्या शिवसेना पक्षाने नगराध्यक्षा पदासाहीत २६ पैकी १७ जागा जिंकत न. प वर एकहाती सत्ता स्थापन केली आहे. तसेच दोन जाग्यांवर मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आणल्याने त्यांच्या नगरसेवकांची संख्या १९ ईतकी झाली आहे काँग्रेस पक्षाचे ४, भाजपा १ तर १ जागेवर उ.बा.ठा उमेदवार निवडून आल्या आहेत.

येणाऱ्या काही आठवड्यात नगर परिषद सभागृहात उपनगराध्यक्ष तसेच तीन स्वीकृत नगरसेवक निवडीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ईच्छुकांनी आतापासूनच नेत्यांची मनधरणी सुरु केली आहे. स्वीकृत नगरसेवक पदासाठी पालिकेत संख्याबळ पाहिले असता शिवसेना महायुतीचे २ सदस्य सहच निवडून येण्याची शक्यता आहे.

यात स्वीकृत नगरसेवक पदासाठी काँग्रेस पक्षाकडून उमेदवार देण्यात येणार असल्याने त्यांना ईतर ४ नगरसेवकांची साथ लागणार आहे. यंदा स्वीकृत नगरसेवक पादासाठी नगराध्यक्षा विद्या कावसणकर यांना ही मतदानाचा अधिकार मिळणार असल्याने शिवसेनेला आणखीन १ मताचा फायदा होणार आहे. स्वीकृत सदस्य पादाच्या निवडीत तिन्ही जागा ताब्यात घेण्यासाठी शिवसेना सरसावली असतांना या निवडीत घोडेबाजार होण्याची दाट शक्यता आहे.

स्वीकृत सदस्य पदासाठी शिवसेनेकडून शेखर शिंदे, जनार्धन मिटकर, ईरफान बागवान, ज्ञानेश घोडके, बाळू माने, अजित पगारे पत्रकार रमेश लिंबोरे, बादशहा परळकर, विजय पापडीवाल, सुनील बलदवा, अमोल पाटील जाधव, पवन लोहिया, स्वदेश पांडे, खुशालराव भवरे, मनीष औटे, अस्लम पठाण, सूर्यकांत गोरे, ज्ञानेश्वर गोरे, संदीप आहेर, सुनील नलभे, राजेश मानधने, विष्णू परदेशी, काँग्रेस तर्फे योगेश सोमनाथराव जोशी, निमेश पटेल यांची नावे आघाडीवर आहे.

## शिवना सर्कलमध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन आ. अब्दूल सत्तारांच्या हस्ते संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि, २५ डिसेंबर :** सिल्लोड तालुक्यातील सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिवना जि. प. सर्कल मधील विविध गावात राबविण्यात आलेल्या जवळपास ७ कोटी ५० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व मंजूर कामांचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले.



शिवना जि. प. सर्कल मधील जळकीबाजार, खुपटा, मादनी,नाटवी, शिवना, डीग्रस, पानवडोद खुर्द व बुद्रुक या गावांत विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, देविदास लोखंडे, राजूबाबा काळे, माजी जि. प.सदस्य मुरलीधरराव काळे, भिका वाघ, माजी सभापती विजय आबा दौड, महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, कृउबा समितीचे उपसभापती संदीप राऊत, नानासाहेब रहाटे, शेख सलीम, विक्रम दौड, सय्यद नासेर हुसेन, सयाजीराव वाघ, राजाराम पाडळे, विठ्ठल जैस्वाल, प्रमोद दौड, प्रेम साळवे, ईश्र्वर कालभिले, किशोर जगताप, सय्यद कैसर, विष्णू अपार, दत्तू दौड यांच्यासह जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता दिलीप फुलारी, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकार्पण करण्यात आलेल्या कामांमध्ये रस्त्यांचे काँक्रीटीकरण व डांबरीकरण, पाणीपुरवठा व्यवस्था, अंगणवाडी बांधकाम, समाज मंदिर, शादिखाना बांधकाम, गाव अंतर्गत पथदिवे रस्ते डांबरीकरण, अंतर्गत गटार व्यवस्था तसेच इतर मूलभूत नागरी सुविधांचा समावेश आहे. या कामांमुळे परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर होऊन जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार यांनी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामांना गती देण्यात येत असून, सर्वसामान्य जनतेच्या गरजा लक्षात घेऊन भविष्यातही अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आ. सत्तार यांनी सांगितले.

## शिवसेनेच्या वतीने शिंदे गट इच्छुकांच्या ३१ डिसेंबर रोजी मुलाखती

**तभा वृत्तसेवा,**

**सिल्लोड, दि २९ डिसेंबर :** जिल्हा परिषद, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेच्या (शिंदेगट) वतीने दिनांक ३१ डिसेंबर २०२५ बुधवार रोजी सिल्लोड येथे ११ वाजता तर सोयगाव येथे दुपारी ३ वाजता मतदारसंघातील शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी वरील वेळेत उपस्थित रहावे असे आवाहन सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, सोयगाव तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

उद्या दि. ३१ बुधवार रोजी सिल्लोड शहरातील पक्षाचे मुख्य कार्यालय शिवसेना भवन येथे सकाळी ११ वा. सिल्लोड तालुक्यातील ९ जि. प. सर्कल व तालुक्यातील १८ पं. स. गणासाठी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहे. तर सोयगाव येथे दुपारी ३ वाजता शिवसेना भवन येथे सोयगाव तालुक्यातील सिल्लोड मतदारसंघात येणाऱ्या फर्दापूर, आमखेडा जि. प. सर्कल व मतदारसंघात येणाऱ्या पंचायत समिती गणासाठी मुलाखती घेतल्या जाणार आहे.

पक्षनिष्ठा, जनसंपर्क, समाजकारणातील कार्य आणि स्थानिक जनतेशी असलेलं नातं – या सर्व बाबींचा सखोल आढावा यावेळी घेतला जाणार आहे. मुलाखतीला केवळ इच्छुकांनी यायचं आहे. कोणीही गर्दी , किंवा शक्तिप्रदर्शन दाखवायचा प्रयत्न करू नये अशा सूचना पक्षाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. इच्छुक उमेदवारांनी दि. ३१ डिसेंबर बुधवार रोजी सिल्लोड येथील शिवसेना भवन येथे सकाळी ११ वाजता तर सोयगाव येथील शिवसेना भवन येथे दुपारी ३ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, सोयगाव तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

## बिडकीन डीएमआयसी प्रकल्पग्रस्त शेतकरी आंदोलन छेडणार

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि, २९ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे दि. २८ डिसेंबर रोजी डीएमआयसी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची महादेव मंदिर परिसरामध्ये बैठक संपन्न झाली. डीएमआयसी प्रकल्प साठी जमीन संपादित करून बारा वर्ष पूर्ण होऊ नये आजपर्यंत डीएमआयसी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या प्रलंबितच आहे. विशेष म्हणजे या कामामध्ये अधिकारी वर्गाची उदासीनता असल्याने प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी २ जानेवारीपासून आंदोलन सुरू करण्याचे ठरवले आहे दोन जानेवारी रोजी डीएमआयसी प्रकल्प ऑफिस कार्यालय कार्यालयास कुलूप ठोकून, कंपन्याची कामे बंद पाडणार व डीएमआयसी प्रशासनाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येणार आहे असल्याचे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आज जाहीर केले.

विशेष म्हणजे प्रकल्पग्रस्तांची बैठक



चालू असताना आमदार विलास भुमरे यांनीही या बैठकीस आपली उपस्थिती लावली व शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे खासदार संदिपान भुमरे यांनी विशेष लक्ष देऊन काही प्रश्न उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडून सोडवले ही मात्र अधिकाऱ्यांच्या उदासीन धोरणाने ती प्रलंबित आहे अशा अधिकाऱ्यावर कारवाई व्हायला पाहिजे असे आमदार विलास भुमरे यांनी याप्रसंगी सांगितले व आपण प्रकल्पग्रस्तांचे पूर्ण प्रश्न मार्गी लागेपर्यंत प्रकल्पग्रस्तांसोबतच आहोत असेही त्यांनी सांगितले. तसेच बिडकीन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांना आंदोलनाबाबतचे निवेदन देतानाही त्यांनी आपली उपस्थिती नोंदवली. विशेष म्हणजे सर्वपक्षीय नेते कार्यकर्ते या आंदोलनामध्ये सहभागी दिसले.

### २ जानेवारी रोजी डीएमआयसी ऑफिसला कुलूप ठोकणार

शेतकऱ्यांनी व खासदार संदिपान भुमरे यांनी डीएमआयसी प्रशासन व उद्योग मंत्री सामंत यांच्या भेटी घेतल्या उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सप्टेंबर २०२५ ला झालेल्या बैठकीत आज पासून एका महिन्यात सर्व प्रश्न मार्गी लागतील असे जाहीर सभेत सांगितले होते मंत्र्यांनी सांगून सुद्धा अधिकारी वर्गाने शेतकऱ्यांची कामे केली नाहीत. त्यामुळे संतप्त झालेले बीएमआय सी प्रकल्पग्रस्त शेतकरी, बेरोजगार युवक व नागरिक दोन जानेवारीपासून तीव्र आंदोलन छेडणार आहेत.

याबाबत सर्वांनीच आपण शांततेमध्ये भूसंपादन प्रक्रिया पार पाडली त्याचा गैरफायदा प्रशासन घेत असून सद्य परिस्थितीत आंदोलन छेडणे हाच त्यावर उपाय असेल असे सांगितले व सर्वांनी आंदोलन करण्याचा निर्धार केला.

याप्रसंगी सरपंच अशोक धर्मे, मनोज पेरे, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, काकासाहेब टेके, उपसरपंच किरण गुजर, अॅड. संचित पातूनकर, मधुकर सोकटकर, प्रवीण चव्हाण, बाबुराव आगाज, अंकुश धर्मे, राजू कोथिंबिरे, सागर फरताळे, अविनाश राठोड, सरपंच संजय गुंजाळ, मधुकर सोकटकर, मोहन हिवाळे, पत्रकार नंदकुमार वैद्य आदी उपस्थित होते.


### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ८६९/२०२५

अर्जदार : १) संदीप देविदासराव साबणे वय ४५वर्ष रा. गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर, २) दिपक देविदासराव साबणे वय ४० वर्ष रा. गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) जयश्री पोपट काळे वय ४२ वर्ष धंदा घरकाम रा. काळे निवास,तेली गल्ली, रविवार पेठ, श्रीगोंदा ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर, ४) मंगलबाई देविदासराव साबणे वय ६३ वर्ष रा. गंगापूर ता. गंगापुर जि.. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

मयत देविदास बाबुराव साबणे हे गंगापूर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०२/११/२०२४ रोजी राहते घरी अल्पशा आजाराने मयत झाले. अर्जदार क्र. १ते ३ हे त्यांचे मुले व मुली असून अर्जदार क्र. ४ ह्या मयत देविदास बाबुराव साबणे यांच्या पत्नी आहे. आता मयत देविदास बाबुराव साबणे यांना अर्जदार क्र १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयत देविदास बाबुराव साबणे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार हेच मयत देविदास बाबुराव साबणे यांचे कायदेशिर वारसदार आहेत. अर्जदार यांना शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत देविदास बाबुराव साबणे यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या मा. न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.करिता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्याने आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी दिले.

लिपिक
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर. एस. तपाडिया मॅडम, दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

अर्जदार

किरकोळ अर्ज क्रमांक ५८१/२०२५

पु तारीखः १३/०१/२०२६

१-मुरलीधर सखाराम कंचार, वय-९० वर्षे, धंदा काही नाही रा. चिखलठाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद (छ. संभाजी नगर), २-भागीनाथ सखाराम कंचार वय ७३. धंदा घरकाम.रा. मु. पो. ढाकेफळ, ता. पैठण, जि. औरंगाबाद (छ.संभाजी नगर), ३-मधुकर सखाराम कोळकंडे उर्फ कंचार, वय ६८. धंदा सेवानिवृत्त, रा. मु. पो. चिखलठाण ता. कन्नड जि. औरंगाबाद (छ. संभाजी नगर).

निरंक

गैरअर्जदार

अर्ज : **वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत.** (Bombay Regulation Act)

तमाम जणतेस सुचित करण्यात येते की ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल अॅड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मौजे चिखलठाण ता. कन्नड येथील रहीवासी आहे अर्जदाराचे वडील सखाराम महादु कंचार हे दिनांक १२/०१/१९७२ रोजी मौजे चिखलठाण ता. कन्नड येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदाराची आई व मयताची पत्नी तान्हुबाई भ्र. सखाराम कंचार या देखील दिनांक १०/०९/१९६३ मौजे चिखलठाण येथे मयत झाल्या आहेत या पुढे मृतांच्या नावाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मयत असे संबोधले जाईल. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जासोबत ग्रामपंचायत कार्यालय मौजे चिखलठाण ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे.व मयतास अर्जदारा व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे. ज्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी इतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किंवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल सबब आज दिनांक २०/१२/२०२५ रोजी माझे सही निशी व मा.न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनाक २०/१२/२०२५

लिपीक, दिवाणी न्यायालय क स्तर कन्नड
आदेशावरुन, दिवाणी व फौजदारी न्यायालय का स्तर कन्नड

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २६३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### उमेदवारीवरुन ठाकरे गटाच्या नेत्यांमध्ये नाराजी नाट्य

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ज्या उमेदवारांना उमेदवारी द्यायचीय. त्यांना काल रात्री मातोश्रीवर बोलवून घेण्यात आलं. रात्री २.३० वाजेपर्यंत उमेदवारांना एबी फॉर्मचं वाटप आणि बैठकांच सत्र सुरु होतं. या दरम्यान वांद्र्यातील एका उमेदवारीवरुन अनिल परब आणि आमदार वरुण सरदेसाई यांच्यात मतभेद झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. वॉर्ड क्रमांक ९५ च्या उमेदवारीवरुन अनिल परब आणि वरुण सरदेसाई यांच्यात मतभेद झाले आहेत. वॉर्ड क्रमांक ९५ मधून हरी शास्त्री यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. ते श्रीकांत सरमळकर यांचे जावई आहेत. श्रीकांत सरमळकर हे स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जायचे. हरी शास्त्री यांना उमेदवारी द्यायला अनिल परब यांचा विरोध होता. पण वरुण सरदेसाई मात्र शास्त्री यांच्या बाजूने होते. त्यावरुन मतभेद झाले. अनिल परब तडक मातोश्रीवरुन निघून गेले अशी सूत्रांची माहिती आहे.

### पुण्यातही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार

**पुणे :** पुणे, पिंपरी–चिंचवडची महानगरपालिका निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार आहेत. तर मुंबईतही दोन्ही राष्ट्रवादींनी वेगळ्याच प्रकारचे अंडरस्टँडिग केल्याचे दिसत आहे. आज दुपारी पुण्यात पत्रकार परिषद होणार असून यावेळी दोन्ही राष्ट्रवादींच्या युतीची घोषणा होण्याची शक्यता आहे. पुणे महानगरपालिकेत अजित पवार गट १२५ तर शरद पवार गट ४० जागांवर लढेल, असे सांगितले जात आहे. पिंपरी–चिंचवडमधील सर्व प्रश्न एकत्रितपणे सोडवण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी तळवडे येथे केली. याच ठिकाणाहून त्यांनी महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडत आगामी निवडणुकीत शहरात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याचे स्पष्ट केले. पिंपरी–चिंचवडनंतर आता पुण्यातही दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### आमिष दाखवून ऑनलाइन फसवणूक

**पिंपरी :** क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक केल्यास अल्पावधीत जादा परतावा मिळेल, असे आमिष दाखवून एका तरुणाची तब्बल ३३ लाख ९६ हजार ७३८ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही फसवणूक १८ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत हिंजवडी परिसरात ऑनलाइन पद्धतीने घडली. याप्रकरणी दिग्विजय सुरेश सुतार (वय ३०, रा. नारायणनगर, हिंजवडी) यांनी शनिवारी (दि. २७ डिसेंबर) हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात संशयितांविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे.

### मातोश्रीवर रातोरात वाटले एबी फॉर्म

**मुंबई :** रविवारी रात्रीपासूनच मातोश्रीवर उमेदवारी निश्चित झालेल्या इच्छुकांची आणि त्यांच्या समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. उद्धव ठाकरे यांनी स्वतः प्रत्येक उमेदवाराची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला आणि आपल्या हाताने अधिकृत एबी फॉर्म सुपूर्द केले. ज्या उमेदवारांची नावे निश्चित झाली होती, त्यांना रात्री फोन करून तातडीने बोलावून घेण्यात आले होते. मनसेसोबतच्या नव्या समीकरणानंतर जागावाटपाचे चित्र स्पष्ट झाल्याने, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणी ठाकरे गटाने आपली ताकद झोकून दिली आहे. महापालिका निवडणुकीच्या या चुरशीच्या वातावरणात, 'मातोश्री'वरून मिळालेल्या या सिग्नलमुळे आता उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आज शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केले जाण्याची शक्यता आहे.

### मुंबईतील जागावाटपावरुन आठवले नाराज?

**मुंबई :** मुंबईतील महायुतीच्या जागावाटपात ठझखला डावललं गेल्याचं सांगत आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी नाराज व्यक्त केली आहे. रामदास आठवलेंनी भाजपला मुंबई महानगरपालिकेसाठी २६ जागांचा प्रस्ताव दिला आहे. त्यापैकी किमान १५ ते १६ जागा मिळाव्यात अशी मागणी आठवलेंनी भाजपकडे केली आहे. यासंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचं त्यांनी सांगितलंय.

### परभणीचा पारा घसरला

**परभणी :** परभणीचा पारा ६.३ अंश सेल्सिअसवर आला असून तापमानाचा पारा दहा अंशाच्या खाली आहे. यामुळे परभणीकरांना करावा लागतोय थंडीचा सामना करावा लागत आहे. ग्राउंडवर वाल्किंग करणारांची संख्या वाढली आहे. परभणी शहरासह जिल्ह्यात मागील महिनाभरापासून तापमानाचा पारा दहा अंशाच्या खाली गेला असल्याने परभणीकरांना कडाक्याच्या थंडीचा सामना करावा लागतोय. आज परभणी शहराचे तापमान ६.३ अंश सेल्सिअसवर जाऊन पोहोचले.

# भाजपकडून ६७ उमेदवारांची यादी जाहीर

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रमुख राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपने मुंबईसाठी ६७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे.

यादीमध्ये अनेक प्रमुख नावांचा समावेश असून, यामध्ये तेजस्वी घोसाळकर (वॉर्ड क्रमांक २), नील सोमय्या (वॉर्ड क्रमांक १०७), नवनाथ बन (वॉर्ड क्रमांक १३५) यांचा समावेश आहे. वरळीतून राजेश कांगडे यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. इतर उमेदवारांमध्ये गणेश खणकर (वॉर्ड क्रमांक ७), तेजिंदर सिंग तिवाना (वॉर्ड क्रमांक ४७), मकरंद नार्वेकर (प्रभाग क्रमांक २२६), हर्षिता नार्वेकर (वॉर्ड २२७), आकाश पुरोहित (वॉर्ड क्रमांक २२२), शिवानंद शेट्टी (वॉर्ड ९), शिल्पा सांगोरे (वॉर्ड क्रमांक १७), यांनाही उमेदवारी मिळाली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. मुंबई महानगरपालिकेसाठी भाजपने आपली रणनीती स्पष्ट करत उमेदवारांना –इ फॉर्म वाटप करण्यास सुरुवात केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपच्या पहिल्या यादीत १२५ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने नवीन युवा चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

स्नेहल तेंडुलकर (वॉर्ड क्रमांक २१८), अजय पाटील (वॉर्ड क्रमांक २१४), सन्नी सानप (वॉर्ड क्रमांक २१९) आणि शिवकुमार झा (वॉर्ड क्रमांक २३) यांचा समावेश आहे.

दुसरीकडे, शिंदेच्या सेनेला मतदारसंघात सहा पैकी चार जागा सुटल्या आहेत. यात सदा सरवणकरांच्या दोन मुलांना, समाधान सरवणकर आणि प्रिया सरवणकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. मिलिंद तांडेल आणि कुणाल वाडेकर

### भाजपतर्फे ३७ महिला निवडणुकीच्या रिंगणात

चिंबूरच्या माजी नगरसेवक अनिल पाटणकरांच्या पत्नी मिनाक्षी पाटणकर यांनी वॉर्ड क्रमांक १५३ मधून निवडणुकीसाठी ए बी फॉर्म घेतला आहे. यामुळे मुंबईतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारांची घोषणा वेगाने सुरू असल्याचे चित्र आहे.



बहुचर्चित मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. भाजपने पहिल्या यादीत ६६ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. भाजपच्या पहिल्या उमेदवार यादीत रणरागिणींचा बोलबाला दिसून येतोय. भाजपची आज देशात आणि महाराष्ट्रात सत्ता आहे. पण मुंबई महापालिका हे त्यांचं अपूर्ण स्वप्न आहे. २०१७ साली भाजपने मुंबई महापालिकेच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढवल्या. त्यांचे ८२ नगरसेवक निवडून आले. पण मुंबई महापालिकेवर झेंडा फडकवण्याचं त्यांचं स्वप्न पूर्ण झालं नाही. याआधी ते शिवसेनेसोबत युतीमध्ये निवडणूक लढवत होते. त्यामुळे महापौर शिवसेनेचा व्हायचा. आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत ते युतीमध्ये निवडणूक लढवणार आहेत. यंदाच्या निवडणुकीत भाजपं मोठा भाऊ तर एकनाथ यांची शिवसेना छोट्या भावाच्या भूमिकेत असेल. त्यामुळे भाजपला यंदा महापौरपदाचं स्वप्न साकार करण्याची संधी आहे. त्यासाठी ते पूर्ण ताकद पणाला लावतील.

# सेप्टिक टँक साफ करताना गुदमरून तिघांचा मृत्यू

### वाचवायला गेलेले पाच जणही गंभीर



**सांगली :** सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर–पेठ हद्दीत असलेल्या एका कंपनीत रविवारी सायंकाळी मोठी दुर्घटना घडली. कंपनीचा सेप्टिक टँक साफ करण्यासाठी उतरलेल्या तीन कर्मचाऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. टँकमधील ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे आणि विषारी वायूमुळे या कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

सेप्टिक टँक साफ करण्यासाठी सुरुवातीला सुभाष जाधव हे टँकमध्ये उतरले होते. मात्र, टँकमधील विषारी वायूमुळे त्यांना चक्कर आली आणि ते आतच कोसळले. सुभाष जाधव यांना वाचवण्यासाठी सचिन तानाजी जाधव तातडीने टँकमध्ये उतरले. मात्र, त्यांनाही वायूची बाधा झाली आणि ते जागीच बेशुद्ध पडले. त्यानंतर कंपनीतील कामगार रंगराव माळी यांनी मदतीसाठी धाव घेतली आणि ते टँकमध्ये उतरले, पण दुर्दैवाने तेही बाहेर येऊ शकले नाहीत. या तिघांनाही तातडीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या तिघांना वाचवण्यासाठी कंपनीतील इतर पाच कामगारांनी प्रयत्न केले. मात्र, वायूचा प्रभाव इतका तीव्र होता की या पाचही जणांची प्रकृती बिघडली. त्यांना अधिक उपचारासाठी कोल्हापूर येथील खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले असून, त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण पेठ आणि ईश्वरपूर परिसरात शोककळा पसरली असून, औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे.

# भारत ७९ हजार कोटींचे शस्त्र खरेदी करणार

**नवी दिल्ली :** जगभरात होत असलेल्या या बदलांना केंद्रस्थानी ठेवून आता भारतानेही आपली संरक्षण क्षमता वाढवण्याचे ठरवले आहे. याचाच एक भाग म्हणू आता भारतानेही शस्त्रसज्जतेसाठी मोठे पाऊल उचलले आहे. भारताने तब्बल ७९००० कोटी रुपयांच्या शस्त्रांना खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे आता भारताचे भूदल, नौदल आणि हवाई दलाला मोठी शक्ती मिळणार आहे. २९ डिसेंबर २०२५ रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत डीएसीची एक बैठक झाली. याच बैठकीत ७९ हजार कोटी रुपयांच्या शस्त्रांना खरेदी करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

### पाकिस्तान, चीनची झोप उडाली,

या बैठकीत शस्त्रखरेदीच्या अनेक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आता भूदलाला लोइटर म्यूनिशन सिस्टम मिळणार आहे. या यंत्रणेमुळे शत्रूंच्या महत्त्वाच्या ठिकाणांना अचूकपणे लक्ष्य करता येणार आहे. यासोबतच लो लेव्हल लाईट वेट रडारही भारतीय भूदलाला मिळणार आहे. यामुळे शत्रूंच्या छोट्या आणि कमी उंचीवरून उडणाऱ्या ड्रोनला तसेच यूएव्हीला ओळखता येईल तसेच ट्रॅकही करता येईल.

आजच्या मंजूर झालेल्या प्रस्तावात नौसेनेसाठीही अनेक शस्त्र, यंत्रणा खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता नौसेनेला बोलार्ड पुल टग्स यासारखी उपकरणं मिळणार आहेत. या यंत्रणेमुळे नौसेनेत असलेल्या जहाजांना तसेच पाणबुड्यांना बंदरावर नेण्यास तसेच आणण्यास मदत होणार आहे. नौदलाला आता हाय फ्रिक्वेन्सी सॉफ्टवेअर डिआईंड रेडिओ मिळणार आहे. यामुळे बोर्डिंग आणि लँडिंग ऑपरेशनदरम्यान अधिक सुरक्षितता मिळेल तसेच संचार व्यवस्था अधिक मजबूत होईल.



सरकारच्या या निर्णयामुळे आता वायुसेनाही चांगलीच बळकट होईल. वायूसेनेले आता अ‍ॅटोमॅटिक टेक ऑफ आणि लँडिंग रेकॉर्डिंग सिस्टिम मिळणार आहे. या यंत्रणेच्या मदतीने कोणत्याही ऋतूमध्ये टेक ऑफ आणि लँडिंगदरम्यान सुरक्षा वाढणार आहे. दरम्यान भारताने तब्बल ७९ हजार शस्त्रांच्या खरेदीसाठी मान्यता दिल्यामुळे पाकिस्तान आणि चीनपुढे नवे आव्हान उभे ठाकले आहे.

## शरद पवारांकडून सात उमेदवारांची यादी

**मुंबई :** मुंबईतून मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून जाहीर करण्यात आलेल्या या यादीत केवळ ७ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मुंबई महापालिका निवडणुकीत मनसे –शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत लढण्याचा निर्णय घेतला आहे.

# मुंबईसाठी काँग्रेसची ७० उमेदवारांची पहिली यादी जाहीर

**मुंबई :** राज्यातील महापालिका निवडणुकांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले असून मुंबईत मोठे राजी–नाराजी नाट्य सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रमुख राजकीय पक्षांकडून उमेदवारांची नावे जाहीर करताना मोठी गुप्तता पाळली जात आहे. भाजप आणि शिवसेना ठाकरे गटाने आपल्या ७० हून अधिक उमेदवारांच्या नावाची यादी जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसने मुंबई महापालिकेसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये, ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात म्हणजे माहिम मतदारसंघातील वार्ड १९२ मधून दीपक भिकाजी वाघमारे यांना उमेदवारी दिली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६ साठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकृत उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात येत आहे. निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन आणि शुभेच्छा. आपली मुंबई घडवूया, मुंबईच्या हितासाठी काँग्रेसला निवडूया, असे म्हणत काँग्रेसने अधिकृतपणे ट्विटर हँडलवरुन उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली आहे.

# उमेदवारी अर्जासाठी पाच हजारांची चिल्लर

**पुणे :** महानगपालिकेच्या निवडणुका जाहीर केल्यानंतर उमेदवारांची लगबगवाढली आहे. काही पक्षांनी काही जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. जाहीर झालेले उमेदवार आपला उमेदवारी अर्जही भरत आहेत. मात्र पुण्यातून एक अजब प्रकार समोर आळा आहे. उमेदवारी अर्ज करण्यासाठी एका उमेदवाराने चिल्लर आणली आहे, त्याने आणलेली नाणी मोजताना अधिकाऱ्यांना अक्षरशः घाम फुटला आहे. पुण्यातील हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे.

### नाणी मोजताना अधिकाऱ्यांना एसीतही फुटला घाम

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २६ (ड) घोरपडी पेठ–गुरुवार पेठ–समताभूमी येथून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरलेल्या गणेश किरण खानापुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. उमेदवारी अर्जासाठी आवश्यक असलेली अमानत रक्कम त्यांनी थेट चिल्लर नाण्यांमधून भरली. नोटांऐवजी केवळ नाणी आणल्यामुळे निवडणूक कार्यालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

गणेश खानापुरे मोठ्या पिशव्यांमध्ये चिल्लर घेऊन निवडणूक कार्यालयात दाखल झाले. नियमांनुसार अमानत रक्कम स्वीकारणे बंधनकारक असल्याने अधिकाऱ्यांना ती रक्कम मोजावी लागली. मात्र नाण्यांची संख्या इतकी मोठी होती की ती मोजताना निवडणूक कर्मचाऱ्यांच्या अक्षरशः नाकीनऊ आले. बराच वेळ या प्रक्रियेत गेला. नाण्यांचे संख्या पाहता अधिकारीही क्षणभर अवाक झाले.

या प्रकारामुळे कार्यालयातील कामकाज काही काळ खोळंबले होते. तथापि, सर्व नाणी मोजून अमानत रक्कम पूर्ण असल्याची खात्री झाल्यानंतर खानापुरे यांचा उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आला. या अनोख्या प्रकारामुळे उपस्थित नागरिक, कर्मचारी आणि इतर उमेदवारांमध्येही उत्सुकता निर्माण झाली होती.

गणेश खानापुरे यांनी यामागचे कारण स्पष्ट करताना सांगितले की, सामान्य माणसाकडे रोजच्या व्यवहारातून जमा झालेली चिल्लरच अधिक असते. निवडणूक प्रक्रियेत सामान्य नागरिकांचे प्रतिनिधित्व व्हावे, हा संदेश देण्यासाठीच मी अमानत रक्कम नाण्यांमधून भरली. नागरिकांनी त्यांना जमेल तसे पैसे दिले तेच आज मी भरले आहे. सामान्य जनता माझ्या पाठीशी आहे त्यामुळे मी ही निवडणूक मी जिंकणार आहे. पुण्यातील या अनोख्या घटनेची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होत असून, महानगरपालिका निवडणुकांपूर्वीच रंगत वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

# फरार मास्टरमाईंडच्या मुसक्या आवळल्या!

### तुळजापूर ड्रग्स प्रकरणाला नवा ट्वीस्ट

**धाराशिव :** तुळजापूर एमडी ड्रग्ज रॅकेटचा गेल्या दहा महिन्यांपासून फरार असलेला मुख्य सूत्रधार अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. तामलवाडी पोलिसांनी मुंबईतील मीरा–भाईंदर परिसरातून अतुल श्याम अग्रवाल याच्या मुसक्या आवळल्या आहेत. या अटकेमुळे बहुचर्चित प्रकरणाच्या तपासाला आणखी वेग येण्याची चिन्हे आहेत. राज्यभर खळबळ उडालेल्या तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील अनेक धागेदोरे उलगडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



तुळजापूर एमडी ड्रग्ज प्रकरणामुळे राज्यातील राजकारणही चांगलेच ढवळून निघाले होते. विशेषतः नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एमडी ड्रग्जवरून मोठे आरोप–प्रत्यारोप झाले होते. या प्रकरणाने केवळ कायदा–सुव्यवस्थेचाच नाही, तर राजकीय वातावरणही तापले होते. अतुल अग्रवाल हा मूळचा राजस्थानचा रहिवासी असून गेली सुमारे २० वर्षे तो मुंबईत वास्तव्यास आहे. मीरा–भाईंदर परिसरात एका लाँड्रीच्या दुकानाच्या आडून तो एमडी ड्रग्जचा काळा बाजार चालवत असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. विशेष म्हणजे २०१४ मध्येही मुंबईत त्याच्यावर ड्रग्ज प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता.

दरम्यान, नगरपालिका निवडणुकीनंतरच मुख्य आरोपीला अटक झाल्याने निवडणुकीपूर्वी ही कारवाई का झाली नाही? असा सवालही आता उपस्थित केला जात असून, या अटकेवरून पुन्हा एकदा राजकीय चर्चांना उधाण येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मुंबईत मनसेची उमेदवारांची पहिली यादी जाहीर!



**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती झाली आहे. शिवसेना आणि मनसे मुंबई महापालिका निवडणुक एकत्र लढत आहेत. बंडखोरी टाळण्यासाठी ठाकरे बंधूनी उमेदवारांना डायरेक्ट एबी फॉर्म देण्याचा निर्णय घेतला. शिवसेना 'उबाठा'कडून ४० जणांना एबी फॉर्मचे वाटप केल्यानंतर मुंबईत मनसेची सांभाव्य उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली आहे. मनसेकडून आतापर्यंत १५ जणांना उमेदवारी देण्यात आली आहे. मनसेने १५ जणांना एबी फॉर्म दिले आहेत.

मुंबई मनपासाठी उद्धव ठाकरेंचे शिलेदार ठरले आहेत. शिवसेना णइढ कडून ४० जणांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. सुनील प्रभूंचा मुलगा अंकित प्रभूसह सुप्रदा फातर्फेकरांना संधी देण्यात आली. ठाकरेंच्या पक्षाने यावेळी नवीन चेहऱ्यांसह काही माजी नगरसेवकांनाही संधी दिली आहे.

## अग्रलेख...

# माओवाद्यांना पळता भुई थोडी...

ओडिशाच्या कंधमाल जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या भीषण चकमकीत ओडिशा राज्य समितीचा प्रभारी केंद्रीय समितीचा सदस्य आणि कोट्यवधी रुपयांचे बक्षीस असलेला क्रूरकर्मा- माओवादी नेता गणेश उईकेचा खात्मा करण्यात आला. मागील काही महिन्यांपासून माओवादाच्या विरोधात राबवल्या जाणाऱ्या कठोर कारवाईमुळे छत्तीसगड, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातून माओवादी चळवळीचे पाय उखडले आहेत. त्यांना लपण्यासाठी कोणतीही जागा आता शिल्लक राहिलेली नसल्याचे सुरक्षा दलांच्या कारवाईवरून स्पष्ट झाले आहे. पूर्वी सुरक्षा दलांचा दबाव वाढल्यावर माओवादी 'रेस्ट झोन'मध्ये जायचे. मात्र, अलिकडच्या काळात केंद्र आणि राज्यांनी राबवलेल्या ठोस आणि समन्वयित धोरणांमुळे माओवादी देशाच्या कोणत्याही भागात सुरक्षित राहिलेले नाहीत, हे स्पष्टपणे दिसून येते. सुरक्षा दलांची वाढलेली कार्यक्षमता, तंत्रज्ञानाचा वापर आणि त्यांची गुप्तचर यंत्रणा अत्यंत निर्णायक ठरली आहे. केंद्रीय राखीव पोलिस दल, त्यांचे कोब्रा हे कमांडो युनिट, राज्य पोलिस दल आणि विशेष पथकांमध्ये समन्वय वाढवण्यात आला आहे. ड्रोन, उपग्रह छायाचित्रे, इलेक्ट्रॉनिक सर्व्हिलन्स आणि अचूक गुप्तचर माहितीच्या आधारे माओवादी तळांवर सातत्याने कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळे पूर्वी सुरक्षित मानल्या जाणाऱ्या जंगलांमध्येही आता माओवादी टिकू शकत नाहीत.

माओवाद प्रभावित भागांमध्ये विकासाला गती देण्यात आली आहे. रस्ते, मोबाईल नेटवर्क, वीज, आरोग्यसेवा, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यामुळे स्थानिक आदिवासी व ग्रामीण जनता माओवादी विचारसरणीपासून दूर जात आहे. लोकांचा पाठिंबा कमी होत असल्याने माओवादी संघटनांची मुळेच कमजोर झाली आहेत. लोकशाही मार्गाने आपले प्रश्न सुटू शकतात, यावर जनतेचा विश्वास वाढत आहे. तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शरणागती आणि पुनर्वसन धोरणही अतिशय महत्त्वाचे ठरत आहे. सरकारने माओवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आकर्षक आत्मसमर्पण योजना राबवल्या आहेत. अनेक कडव्या माओवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून समाजात परतण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संघटनांतील मनोबल खचले असून, नेतृत्वावरही ताण वाढला आहे. या वाढलेल्या ताणामुळे नेतृत्व बरेचदा चुकीचे निर्णय घेतले जातात. याशिवाय माओवाद्यांच्या शहरी नेटवर्कवरही मोठा आघात करण्यात आला आहे. 'अर्बन नक्षल' जाळे, आर्थिक स्रोत, बौद्धिक पाठबळ आणि दळणवळण यंत्रणा उघडकीस आणून त्यावर कायदेशीर कारवाई केली जात आहे. त्यामुळे माओवादी चळवळीला मिळणारा अप्रत्यक्ष आधारही मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे. आजची परिस्थिती पाहता माओवादी संघटना केवळ काही भागांपुरत्या आणि बचावात्मक भूमिकेत अडकल्या आहेत. सततच्या कारवायांमुळे नक्षलवादी स्थलांतरित होत आहेत, विखुरले जात आहेत आणि त्यांच्या हालचालींवर कडक नजर ठेवली जात आहे. एकंदरीत मजबूत राजकीय इच्छाशक्ती, प्रभावी सुरक्षा धोरण, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि जनतेचा वाढता सहभाग यामुळे माओवादाची पकड सैल झाली आहे. केंद्र आणि राज्यांच्या कठोर धोरणामुळे माओवाद्यांची हालचाल अतिशय मर्यादित झाली आहे. परिणामी, त्यांच्या तथाकथित 'क्रांती'च्या दाव्यांवर त्यांच्याच कॅडरचा विश्वास उरलेला नाही. पूर्वी जंगल, दुर्गम भाग आणि आदिवासी वस्त्यांमध्ये माओवाद्यांचा प्रभाव होता. मात्र, सातत्याने होणाऱ्या चकमकी, अटक सत्रे, शरणागती योजना आणि वरिष्ठ नेत्यांचा खात्मा यामुळे संघटनेची नेतृत्वरचना कमकुवत झाली आहे. अनेक कॅडर सदस्य स्वत:च्या सुरक्षिततेबाबत साशंक झाले असून, नेतृत्व त्यांना योग्य संरक्षण देऊ शकत नाही, ही भावना बळावली आहे. सुरक्षा दलांच्या वाढत्या कारवायांमुळे आर्थिक स्रोतांवरही मोठा आघात झाला आहे. विकासकामे, रस्ते, दळणवळण आणि कल्याणकारी योजनांमुळे स्थानिक जनतेचा सरकारवरील विश्वास वाढत असून, माओवाद्यांना मिळणारा पाठिंबा घटत आहे. प्रभावी सुरक्षा कारवाया आणि समांतर विकास धोरणांमुळे माओवादी चळवळीचा पाया हादरला आहे. नेतृत्वावरचा विश्वास खचल्याने आणि भविष्याबाबत अनिश्चितता वाढल्याने या चळवळीचे अस्तित्व संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

कधीकाळी माओवादी हे आदिवासींचे आदर्श आणि आधार समजले जात होते. त्यांनी आदिवासी समाजातील काही वाईट रूढी-परंपरा बंद केल्या होत्या. मात्र, साधारण २००० पासून माओवादी चळवळ अतिशय हिंसक होत गेली. केवळ संशयावरून आदिवासी आणि दलितांचे माओवाद्यांनी गळे चिरले. शिक्षण घेणाऱ्या तरुणांची नृशंस हत्या केली. त्यामुळे त्यांनी आदिवासी समाजाचा विश्वास गमावला. आदिवासी बांधव केवळ जीव वाचवण्यासाठी त्यांना मदत करायचे हे आता सिद्ध होत आहे. माओवादी नेत्यांनी केलेली दुसरी मोठी चूक म्हणजे, माओवादी चळवळ ही कॅडर-केंद्रित रचनेवर उभी होती. मागील काही काळात कॅडरवर लादण्यात आलेली अतिशय कठोर लष्करी सक्ती, वाढता दबाव, अंतर्गत दहशत आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास यामुळे ही चळवळ हळूहळू विखुरली जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. माओवादी संघटनेत कॅडरला केवळ कार्यकर्ता न मानता 'क्रांतीचा सैनिक' म्हणून घडवले जाते. आदिवासी आणि दुर्गम भागांतील तरुणांना भरती करून त्यांना विचारधारेचे शिक्षण, लष्करी प्रशिक्षण आणि कठोर शिस्त लावली जाते. सुरुवातीला शोषणाविरुद्ध लढा, जल-जंगल-जमीन यांचे रक्षण अशी खोटी उद्दिष्टे सांगितली जातात. मात्र, संघटनेत खोलवर गेल्यावर कॅडरला वैचारिक प्रेरणेपेक्षा लष्करी आज्ञापालनालाच अधिक महत्त्व दिले जाते. माओवादी चळवळीत कॅडरवरील लष्करी सक्ती ही बहुआयामी आहे. वरिष्ठ नेतृत्वाचा आदेश न पाळल्यास शिक्षा, विचाराविना फाशी, मारहाण किंवा बहिष्कार यासारखी अमानवी दंडप्रणाली वापरली जाते. अनुभव नसलेल्या कॅडरला थेट सुरक्षादलांविरोधात घातपाती कारवायांमध्ये ढकलले जाते. संघटना सोडण्याचा विचार करणेही गद्दारी मानली जाते. परिणामी कॅडर मानसिक गुलामगिरीत अडकतो. माओवादी चळवळ आदिवासींच्या हक्कांची भाषा करते; परंतु प्रत्यक्षात सर्वाधिक शोषण आदिवासी कॅडरचेच होते. जंगलात सतत होणारे स्थलांतर, अपुरा आहार, औषधोपचारांचा अभाव, जखमी अवस्थेतही लढाईस भाग पाडणे, हे सर्व कॅडरच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनते. वरच्या फळीतील नेते तुलनेने सुरक्षित ठिकाणी राहत असताना, कनिष्ठ कॅडर मात्र थेट सतत मृत्यूच्या दारात उभे राहतात. या दुटप्पी धोरणामुळे संघटनेवरील विश्वास ढासळला आहे. सुरक्षा दलांनी माओवादी प्रभावक्षेत्रात सातत्यपूर्ण आणि अचूक कारवाया केल्यामुळे संघटनेवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. या दबावातून बाहेर पडण्यासाठी नेतृत्व कॅडरवर अधिकाधिक लष्करी सक्ती लादत आहे. दीर्घ पल्ल्यांचे मार्च, वारंवार घातपात, मोठ्या प्रमाणावर आयईडी वापरणे यामुळे कॅडरचा थकवा वाढतो. परिणामी संघटनेतील शिस्त भीतीकडे वळते आणि भीती दीर्घकाळ टिकू शकत नाही. 'जनतेसाठी लढा' या घोषणेऐवजी 'जिवंत राहण्यासाठी लढा' ही भावना कॅडरमध्ये रुजत आहे. आपण खरोखरच जनतेसाठी लढतो आहोत का, हिंसेचा मार्ग आदिवासी विकासाला मदत करतो का, नेतृत्व स्वत: सुरक्षित राहून आम्हाला बळी देत आहे का, या उद्भवणाऱ्या प्रश्नांमुळे संघटनेत फूट पडू लागली आहे. महिला कॅडर माओवादी चळवळीचा महत्त्वाचा घटक मानल्या जातात. त्यांच्यावर दुहेरी अन्याय होतो. एकीकडे लष्करी सक्ती, तर दुसरीकडे भावनिक, सामाजिक आणि कधी कधी लैंगिक शोषण होते. यामुळे अनेक महिला कॅडर भावनिकदृष्ट्या कोलमडतात आणि संघटनेपासून दुरावतात. कॅडरवरील अमानवी लष्करी सक्तीचा थेट परिणाम म्हणजे आत्मसमर्पणाकडे कल वाढला आहे. कॅडरवरील वाढती लष्करी सक्ती ही माओवादी चळवळीच्या विघटनाचे प्रमुख कारण ठरली आहे. विचारधारेऐवजी हिंसा, लोकसमर्थनाऐवजी भीती आणि संघर्षऐवजी अंतर्गत दडपशाही यामुळे चळवळीचा फोलपणा समोर आला. आता त्यांचा एकेक मोहरा टिपला जात असल्याने त्यांना पळता भुई थोडी झाली आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# ऑपरेशन सिंदूरचे वर्ष!

२०२५! आणखी एका भारत-पाकिस्तान संघर्षाचे वर्ष. तीन दिवसांनी सरणाऱ्या या वर्षाचा उल्लेख ऑपरेशन सिंदूरचे वर्ष असा केला जाईल. तब्बल २५ वर्षांनंतर दोन्ही देशांत झडलेला हा संघर्ष केवळ ९६ तास चालला, तरी त्याची नोंद साऱ्या जगाला घ्यावी लागली.

ऑपरेशन सिंदूरचे सर्वांत प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हे युद्ध परंपरागत शस्त्रांऐवजी प्रक्षेपणास्त्रांनी लढले गेले. भारताने 'ब्रह्मोस' प्रक्षेपणास्त्रांचा मुक्तपणे वापर केला तर पाकिस्तानने अन्य प्रक्षेपणास्त्रांसोबत 'फतेह-२' या लांब पल्ल्याच्या प्रक्षेपणास्त्रांचा वापर केला. पाकिस्तानने नवी दिल्लीच्या दिशेने सोडलेले हे प्रक्षेपणास्त्र हरयाणातील सिरसा येथे पाडण्यात आले. या संघर्षात सैनिक, रणगाडे यांनी परस्पर देशांच्या सीमा ओलांडल्या नाहीत. किंबहुना या संघर्षात याचा फारसा वापरच झाला नाही. वापर झाला तो लढाऊ विमानांचा व भूतलावरून डागल्या गेलेल्या प्रक्षेपणास्त्रांचा.

**११४ विमानांचा वापर :** चार दिवसांच्या या युद्धात ११४ लढाऊ विमानांचा वापर करण्यात आला. यात भारताची ७२ तर पाकिस्तानची ४२ विमाने होती. दुसऱ्या महायुद्धानंतरचा हा सर्वांत मोठा हवाई संघर्ष असल्याचे म्हटले जाते.

**शरीफ पराभूत :** १०० तासांच्या या संघर्षात पाकिस्तान सरकार पराभूत झाले. कारण त्यानंतर पाकिस्तानच्या क्षितिजावर असीम मुनीर या लष्करी अधिकाऱ्याचा 'पंचतारांकित' उदय झाला. मुनीर यांना पंचतारांकित फिल्ड मार्शल करण्यात आले तर लोकनिर्वाचित सरकारचे पतन झाले नसले तरी या सरकारची पत मात्र गेली. हा परिणाम होता ऑपरेशन सिंदूरचा. अर्थात भारतासाठी ही बाब चांगली मानली जात नाही. पाकिस्तानात मुलकी सरकार असताना दोन्ही देशांच्या संबंधात कमी तणाव राहात गेला हा इतिहास आहे आणि जेव्हा जेव्हा देशात लष्करी शासक आले त्यांनी भारताच्या विरोधात आघाडी उघडली.

**जगात दखल :** साऱ्या जगातील सरंक्षण तज्ज्ञांनी दखल घ्यावी असे हे युद्ध होते. जगातील अनेक संरक्षण विषयक अध्ययन करणाऱ्या संस्थांमध्ये या युद्धाचे धडे शिकविले जातील. या संघर्षाबाबत अनेक जागतिक संस्थांनी- देशांनी अहवाल तयार केले असून, त्यात या चार दिवसांत झडलेल्या घटना तासागणिक मांडण्यात आल्या आहेत. चीन, रशिया, अमेरिका, फ्रान्स, नाटो व ब्रिटन यांनी याबाबत आपापले अहवाल तयार केले आहेत. त्यावरून त्या देशांना जो निष्कर्ष काढावयाचा आहे, तो त्यांनी काढला आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प हे वारंवार आपण हा संघर्ष संपविल्याचा दावा करीत असले तरी त्यांनी अद्याप याबाबत पुरावा सादर केलेला नाही. भारताने मात्र याचा अगोदरच इन्कार केला आहे.



भारत-पाकिस्तान संघर्षाकडे मुस्लिम देशांचे विशेष लक्ष लागले होते. बहुतेक देशांनी पाकिस्तानला गुप्त मदत केली. फक्त तुर्कीने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला होता.

**ट्रम्प-ग्रहण :** २०२५ च्या प्रारंभी २० जानेवारी रोजी शपथ घेतलेल्या राष्ट्रपती ट्रम्प यांची दुसरी कारकीर्द भारतासाठी त्रासदायक ठरली. त्यांनी भारताला अडचणीत आणणारे अनेक निर्णय घेतले. भारतावर ५० टक्के आयात शुल्क लावीत असताना पाकिस्तानवर फक्त १९ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांनी भारतावर लावलेल्या वाढीव आयात शुल्काचा फायदा झाला तो मात्र भारताचा कट्टर शत्रू असलेल्या चीनचा. भारतीय वस्तूंची अमेरिकेत होणारी निर्यात एकीकडे मंदावली असताना, भारतातून चीनमध्ये होणारी निर्यात जवळपास ३३ टक्क्यांनी वाढली. यात भारताचा फायदा झाला, पण चीनचाही मोठा फायदा झाला. भारत व पंतप्रधान मोदी आपले मित्र आहेत असे म्हणत म्हणत ट्रम्प यांनी भारताच्या विरोधात निर्णय घेण्याचा जणू सपाटा लावला. भारतीयांना अमेरिकेत व्हिसा मिळणे त्यांनी अवघड करून टाकले. राष्ट्रपती ट्रम्प यांनी गोल्डन व्हिसा नावाचे प्रकरण सुरू केले. १० लाख डॉलर म्हणजे ९ कोटी रुपये एवढी रकम भरून हा व्हिसा मिळणार आहे, जो मिळविणे सामान्य भारतीयांसाठी अशक्य ठरणार आहे. ट्रम्प एवढ्यावरच थांबले नाहीत तर भारताचा आणखी एक कट्टर शत्रू पाकिस्तानला अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञान देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ट्रम्प यांच्या या धोरणांमुळे जागतिक समीकरणे पार बदलून गेली.

**डॉलर मजबूत :** राष्ट्रपती ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकन चलन डॉलर काही प्रमाणात मजबूत झाले. वर्षाच्या प्रारंभी ८५ रुपयांत एक डॉलर मिळत होता तर वर्ष संपता संपता एका डॉलरसाठी ९० रुपये मोजावे जाऊ लागले. नव्या वर्षात राष्ट्रपती ट्रम्प आणखी कोणते नवे निर्णय घेतात हे दिसणार आहे.

**१४०४ वा दिवस! :** केवळ चार दिवसांत युक्रेन गिळंकृत करण्याच्या योजनेने राष्ट्रपती पुतिन यांनी सुरू केलेले युक्रेन युद्ध आता पाचव्या वर्षात पदार्पण करणार आहे. आज या युद्धाचा १४०४ वा दिवस आहे. या काळात रशियाने युक्रेनचा काही भाग ताब्यात घेतला असला तरी याची फार मोठी किंमत रशियाला मोजावी लागत आहे. किमान १० लाख सैनिक, ३०० विमाने, १००० रणगाडे, काही युद्धनौका यासह आणखी लष्करी साहित्य रशियाने गमावले असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे युक्रेनने रशियाच्या काही बड्या लष्करी अधिकाऱ्यांना ठार करण्यात यश मिळविले. लेफ्टनंट जनरल सर्वारोव्ह यांची मास्कोत करण्यात आलेली हत्या त्या मालिकेतील ताजी घटना मानली जाते.

**युक्रेनलाही तडाखा :** युक्रेनलाही अर्थातच जबर किंमत मोजावी लागत आहे. या काळात युक्रेनने ड्रोन नावाचा नवा पैलू जोडला. विशेष म्हणजे यांचे उत्पादन युक्रेनमध्ये केले जात आहे. युक्रेनने रशियावर अतिशय घातक असे ड्रोन हल्ले चढविण्यात यश मिळविले. याचीच पावती म्हणजे वर्ष संपत आले असताना युरोपियन युनियनने युक्रेनला बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेतला. ही रकम काही हजार कोटींच्या घरात असल्याचे सांगितले जाते. रशियाने युक्रेनवर मोठे हल्ले चढविले असले तरी त्याला युक्रेनचा पाडाव मात्र करता आलेला नाही. युक्रेन लढत आहे. अर्थात युरोपातील देशांच्या पाठिंब्यामुळे. आता अमेरिकाही युक्रेनला लांब पल्ला असलेली प्रक्षेपणास्त्रे देण्याचा विचार करीत असल्याचे कळते.

**एक युद्ध थांबले :** २०२५ मध्ये एक युद्ध मात्र थांबले. इस्रायल व हमास यांच्यात दोन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या युद्धाची समाप्ती झाली असली तरी गाझा पट्टीत असलेला तणाव कायम आहे आणि हमासही कायम आहे. कारण युद्ध थांबल्यावरच हमासने आपल्या ताब्यातील इस्रायली नागरिकांची सुटका केली. याचीही फार मोठी किंमत हमासने वसूल केली. इस्रायलच्या ताब्यातील हजारो पॅलेस्टिनींना त्याला सोडावे लागले. राष्ट्रपती ट्रम्प हे आपण ६ की ७ युद्धे संपविल्याचा दावा करीत आहेत. त्यात काही प्रमाणात तथ्य मानले जाते. कारण इस्रायल-हमास संघर्ष संपविण्यात त्यांची मध्यस्थी कामी आली. मात्र रशिया-युक्रेन संघर्ष संपविण्यासाठी अलास्कात झालेली शिखर परिषद अपयशी ठरली. हे युद्ध संपविण्यासाठी ट्रम्प यांनी अद्याप आपले प्रयत्न सुरू ठेवले असल्याचे मानले जाते. रशिया-युक्रेन युद्ध संपविण्यात ट्रम्प यशस्वी झाले तर ते मात्र ट्रम्प यांचे एक मोठे यश मानले जाईल.

२०२६ मध्येही रशिया-युक्रेन युद्ध सुरू राहील असे दिसते. या नव्या वर्षात भारत-पाकिस्तान यांच्यात पुन्हा एक संघर्ष झडेल काय? कारण, भारताने ऑपरेशन सिंदूर संपविलेले नाही तर ते फक्त स्थगित केलेले आहे.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# कानात गाणे अन् रस्त्यावर मरणे!

संगीत हे औषध आहे. जे संबंधित व्यक्तीच्या मनातील जखमा भरून काढते. पण हे औषध केव्हा उपयोगी पडते त्याचे ठोकताळे ठरलेले आहेत. तुम्ही एकांतात बसून कानात हेडफोन लावून गाणे ऐकले तरच ते लाभदायक ठरते. रस्त्यावर वाहन चालवीत असताना तुम्ही हेडफोनद्वारे कानात गाणे ऐकत असाल तर ते यमाकडे जाण्याचे आमंत्रण ठरते. म्हणूनच कानात गाणे असले तर रस्त्यावर मरणे हमखास पक्के असते. मग अशावेळी ते संगीत औषधाचे नव्हे तर यमाला खुश करणारे ठरते. हा भयावह प्रकार आपल्या देशात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शंभरपैकी ८० वाहनचालक ब्ल्यूट्यूथ हेडफोनचा वापर करून गाणे ऐकत असतात. परिणामी त्यांचे रस्त्यावरील वाहनांकडे लक्ष नसते. ते आपल्याच धुंदीत जातात आणि समोरच्याला धडक मारतात. अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंग ओढवतो अन् मागून एखादे मोठे वाहन येऊन त्यांना चिरडून जाते. यावर लोक संताप व्यक्त करतात. मात्र मूळ समस्या काय यावर कुणाचेही लक्ष नसते. या जीवघेण्या प्रकारावर आजच नियंत्रण न आणल्यास उद्या लोक रस्त्यावर मरतील. ते मरणे आपल्या देशाला परवडणारे नाही. आपला देश युवकांचा असल्याचा आपण अभिमान बाळगतो. पण आपले युवक तर हेडफोन लावत गाणे ऐकण्यातच मशगूल झाले आहेत. त्यांच्याकडून तुम्ही चांगल्या गोष्टींची अपेक्षा नेमकी करणार कशी? कारण त्यांना गाणे ऐकल्याशिवाय चैन पडत नाही. ते मोबाईलच्या चक्रव्यूहात पूर्णत: अडकले आहेत.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या चालकाने वाहन चालवीत असताना मोबाईल पाहिला तर बातमी बनते. मग जे हजारो दुचाकीचालक, कारचालक, ऑटोचालक, ई-रिक्षाचालक कानात गाणे ऐकतच वेगाने जातात, त्यांचे काय? त्यांनी खुशाल गाणे ऐकावे, पण ते घरी बसूनच. रस्त्यावर जेव्हा ते वाहन चालवितात तेव्हा त्यांनी वाहतूक नियम पाळायलाच हवे. कारण त्यांच्या चुकीची शिक्षा एखाद्या निष्पाप व्यक्तीला भोगावी लागते. त्यांची तर मजा होते पण ती समोरची व्यक्ती चूक नसतानाही यमाघरी जाते किंवा जायबंदी होत दवाखान्याचे बिल भरत भसते. परिणामी त्याचे कुटुंबीय देशोधडीला लागते. त्याला अपघातानंतर लाखो रुपये स्वत:च्या उपचारांवर खर्च करावे लागतात. पोलिस यंत्रणा आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करून काही वेळाने त्याला सूचनापत्र देऊन सोडून देते. पोलिसांना वाटते आम्ही कारवाई केली, पण जो रुग्णालयात उपचार घेत असतो, त्याचे काय? त्याचा विचारच करायला कुणालाही वेळ नाही. जायबंदी झालेला मीच पापी असे समजून स्वत:लाच कोसत बसतो. या सर्व समस्यांतून अनेक जण गेले आणि जात आहेत. यावर आता उपाय करायचा झाल्यास ज्याच्या हातून अपघात झाला त्याच्याकडूनच जखमींचा संपूर्ण खर्च कठोरतेने वसूल करावा. नव्हे तशाच नियमांची तरतूद कायद्यात करायला हवी. जोपर्यंत जायबंदी झालेली व्यक्ती पूर्णपणे बरी होत नाही तोवर आरोपीकडून खर्च घ्यावा. तो देत नसल्यास त्याची संपत्ती विकावी. चूक झाल्यावर सॉरी म्हणायचे आणि जखमींना रस्त्यावर तडफडत सोडून द्यायचे हा प्रकार त्वरित संपुष्टात यावा. जेव्हा चूक केल्यावर उपचारांचा खर्च करण्याची शिक्षा होईल, त्यानंतर कुठलाही चालक कानात गाणे वाजवीत वाहन चालविण्याचे धाडस करणार नाही. पण अशी व्यवस्था खरोखरच भारतात अंमलात येऊ शकते का, तर याचे उत्तर होय असेच द्यावे लागेल. याअनुषंगाने सरकारने कायदे तयार करावेत किंवा सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देश द्यावेत. वस्तुत: रस्त्यावर हेडफोनचा वापर टाळा, जीवघेणा अपघात टाळा हा मंत्र प्रत्येकाने कृतीत आणावा. शेवटी, सुरक्षित राहायचे झाल्यास कानात हेडफोन, डोक्यात मज्जा। अपघाताची मिळेल मोठी सजा! ही वास्तविकता समजूनच वाहन चालवावे.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# निवडणूक निकालांचा संदेश

नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. यामध्ये भाजपला भरघोस यश मिळाले. विरोधकांचे मनसुबे हाणून पाडत भाजप क्रमांक एकचा पक्ष बनला आहे. हे यश निर्विवादपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मिळालेले आहे. यशासारखे दुसरे काहीच नाही, असे म्हटले जाते. परंतु ज्यांना दीर्घ काळाचे राजकारण करायचे आहे, त्यांनी सत्ता, निवडणूक, पक्ष कार्यकर्ता आणि जनता या सर्वच बाबींचा विचार करण्याची आवश्यकता असते.

खेड्यापाड्यातील गटातटाचे राजकारण हे बरेचदा जातिपातीचे असते. वर्षांपासून एकमेकांच्या सोबत राहणारा समाज हा अशा निवडणुकांच्या माध्यमातून जातिपातींमध्ये विभागला जातो. समाजाला एक करण्याचे प्रयत्न समाजामध्ये काही संघटना करताना दिसतात. परंतु सध्याचे राजकारण मात्र हे समाजाला विभाजित करतानाच दिसते. अनेकानेक वर्षे जे कार्यकर्ते सोबत काम करतात, बरेचदा त्यांना एकमेकांची जात माहीत नसते. परंतु निवडणुकीच्या निमित्ताने ती माहिती होते. राजकीय पक्ष हे तर केवळ जातीच्याच आधारावर कार्यकर्त्यांचा विचार करताना दिसतात. कार्यकर्ता किती चांगला आहे, तो जनतेसाठी किती वेळ देणार आहे, तो पक्षाचे काम किती वाढवू शकतो यापेक्षाही त्याचा समाज, त्याच्या मतदारसंघात किती राहतो, तो निवडून येऊ शकतो की नाही, पैसे पाण्याने तो बरोबर आहे की नाही याचा विचार साधारणत: राजकीय पक्ष करताना दिसतात. जातिगत राजकारणाच्या पलीकडे राजकारण कधी जाणार आहे? चांगल्या लोकांना राजकारणामध्ये आणून जनतेसमोर चांगले आदर्श कधी निर्माण करणार आहोत? याचा विचार राजकीय पक्षांनी व त्याच्या नेतृत्वाने करण्याची आवश्यकता आहे.

सध्या भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर इतर पक्षांतील लोकांचा प्रवेश सुरू आहे. ठिकठिकाणी काँग्रेस कशी नामोहराम होईल, त्याला कसे खिंडार पडेल याचा प्रयत्न स्वाभाविकपणे भाजपद्वारे सुरू आहे. याच पृष्ठभूमीवर ज्या पक्षांना फारसे राजकीय भविष्य नाही असे ज्यांच्या कार्यकर्त्यांना वाटते, त्या पक्षामधून सुद्धा भाजपमध्ये येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. स्वाभाविकपणे येणारा मोठा नेता आपल्या सोबत त्याचे वलय, त्याचे कार्यकर्ते, पैसा, प्रसिद्धी, सर्वदूर असलेला संपर्क इत्यादी गोष्टी घेऊन येत असतो. त्यामुळे निवडणुकीच्या काळामध्ये तिकीट वाटप करीत असताना पक्षनेतृत्वाला स्वाभाविकपणे जिंकणारा कार्यकर्ता पाहिजे असतो. कार्यकर्ता जुना असेल, निष्ठावान असेल, परंतु जर तो जिंकू शकत नसेल असे नेतृत्वाला वाटत असेल तर नेतृत्व त्याला बाजूला करून पक्षातील असो की बाहेरून आलेला असो अशांवर आपला डाव खेळत असते. आणि येथूनच पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीची सुरुवात होते. अनेक वर्षे पक्षामध्ये घालवणारे कार्यकर्ते शेवटची संधी म्हणून एकदा अपक्ष म्हणून उभे राहण्याचा प्रयत्न करतात किंवा इतर कुठल्या पक्षाकडून उभे राहण्याचा प्रयत्न करतात. बंडखोरी रोखण्यासाठी अगदी शेवटपर्यंत नाव निश्चित न करणे अशा पद्धतीचा प्रयत्न सुद्धा किंवा खेळी सुद्धा पक्षाकडून खेळली जात असते.

सध्याच्या राजकारणामध्ये नामशेष होत चाललेली गोष्ट म्हणजे कार्यकर्ता होय. एकेकाळी काँग्रेसचा खूपच बोलबाला होता. काँग्रेसच्या तिकिटावर एखाद्या दगडाला सुद्धा उभे केले तरीसुद्धा लोक त्याला निवडून देत होते. याला कारण म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या आधीपासून काँग्रेस पक्ष कामात होता. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वाभाविकपणे लोकांना परिचयाचे नाव काँग्रेसचे होते. काँग्रेसमध्ये मोठमोठे नेते होते. त्यामुळे निवडणुका सहजपणे जिंकल्या जात होत्या. परंतु पुढे मात्र जनतेने त्यांना नाकारले आणि मोदी सरकार सत्तेत आले.

परंतु काँग्रेसची फाईव्ह स्टार संस्कृती, हाय कमांड संस्कृती हळूहळू सर्वच राजकीय पक्षांना चांगली वाटू लागली. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांसमोरची सगळ्यात मोठी समस्या म्हणजे कार्यकर्ता आहे. आज सर्वच पक्ष हे नेत्यांच्या भोवती फिरणारे पक्ष आहेत. जनता सुद्धा एखाद्या नेत्याला पाहून त्याच्या पक्षाला विजयी करते आहे. त्यामुळे इतर पक्षांतून कार्यकर्ते आपल्या पक्षाशी जोडले पाहिजे असे न वाटता इतर पक्षातील नेते आपल्या पक्षाला जोडले पाहिजे अशी मानसिकता राजकीय पक्षांची झालेली आहे.

काँग्रेसचे विकासविरोधी राजकारण, हिंदुत्वविरोधी राजकारण जनतेने नाकारले आणि पर्याय म्हणून भारतीय जनता पक्षाकडे त्यांनी बघितलेले आहे. सध्या तरी भारतीय जनता पक्ष सर्वत्र विजयी घोडदौड करीत आहे. परंतु एकेकाळी काँग्रेसची मुळे खोलवर गेलेली होती त्यामुळे त्यांना उखडून फेकण्याकरिता भाजपला जवळपास ६५ वर्षे मेहनत करावी लागली. मोदी लाट, मोदींचा करिष्मा हा भाजपाला सत्तेमध्ये बसविणारा सगळ्यात मोठा घटक आहे, ही गोष्ट नाकारता येणार नाही. नेता कोणीही असो आम्ही गावागावात जाऊ, लोकांना संघटित करू आणि पक्षाला पुन्हा एकदा विजयी करू या गोष्टी भाषणातून नेते करू शकतात. परंतु त्यांना ही वस्तुस्थिती माहिती आहे की ते सर्व करण्यासाठी लागणारा कार्यकर्ता आपल्याकडे उरलेला नाही. कार्यकर्ता बनविण्यासाठी लागणारी कुठलीही कार्यपद्धती राजकीय पक्षांजवळ नसल्यामुळे व विचारधारेला तिलांजली दिलेली असल्यामुळे जोपर्यंत उतार आहे तोपर्यंत गाडी धावेल. परंतु चढाव आल्यानंतर खरोखरच ती चालू आहे की उतारावर धावत होती हे समजेल. काँग्रेसने पैशांच्या भरवशावर निवडणुका जिंकता येतात हे इतके वर्षे सर्वच राजकीय पक्षांना शिकविलेले आहे. परंतु काँग्रेसला सुद्धा भुईसपाट व्हावे लागले. त्यामुळे पक्षाला जर दीर्घकाळ सत्तेत ठेवायचे असेल तर जनमानस हे आपल्या विचारधारेच्या बाजूने वळविणे आवश्यक आहे. त्यासाठी कार्यक्रम, उपक्रम व प्रयासांची आवश्यकता असते. कार्यकर्त्यांना सुद्धा विचारधारा समजावून सांगण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. एकेकाळी काँग्रेसला नेहरूनंतर कोण हा प्रश्न भेडसावत होता.

निवडणुका आल्या की उमेदवाराचा शोध सुरू होतो. असे करण्यापेक्षा पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकीसाठी आमच्या पक्षाचे संभाव्य उमेदवार सर्व जातिपातीमधील कोण राहणार आहेत त्यांना निवडणे, पक्षाच्या सर्वच कार्यक्रमात त्यांना क्रियाशील ठेवणे, नेतृत्व कसे केले पाहिजे, लोकाभिमुख कसे राहिले पाहिजे, जनतेचे प्रश्न कसे शोधले पाहिजे व सोडवले पाहिजे या सर्वच गोष्टींचे प्रशिक्षण व यावर कार्य होत राहिले पाहिजे. सध्या पक्षाच्या चिन्हावर उमेदवार विजयी होत आहेत. पक्ष किंवा विचारधारेवर नाही हे लक्षात घेतले पाहिजे. ज्याला आपण वाढ समजतो कदाचित ती सूज असू शकते. महापूर ओसरल्यानंतर खरे पाणी किती आहे हे कळून येत असते. हे सत्य लक्षात घेऊन प्रत्येक निवडणुकीच्या निमित्ताने पक्षाचा विस्तार किती झाला, किती नवीन कार्यकर्ते मिळाले याचा विचार केला गेल्यास प्रत्येक निवडणूक ही विस्ताराची संधी ठरेल आणि सत्ता मिळाल्यास ती सुशासनाचे प्रदर्शन करण्याचे निमित्त ठरू शकते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-८७

सोमवार, २९ डिसेंबर २०२५

### गीत व्हावे जीवनाचे ते तुझे मृदु हासणे

गीत व्हावे जीवनाचे ते तुझे मृदु हासणे
तूच माते तीर्थ आम्हा तूच आशा बंधने ॥धृ॥

तप्त ठिणग्या नाचती या खड्गसंघर्षातुनी
आग त्याची दिव्य दाहक उतरु दे अमुच्या मनी
तापलेल्या हिमगिरीची आच लागुनि अंतरी
वितळुनी जाऊच दे अन् शीत बर्फाची दरी
पेटु दे यांतून आई नासले कुजले जिणे ॥१॥

फुलविले होतेस तेव्हा स्फूर्तिचे स्फुल्लिंग तू
शकहुणांचा पाशवी उन्माद जेव्हा ये उतू
दाहिराच्या कन्यकांचे मृत्युला आव्हान ते
नाचुदे अमुच्या उरी क्षण चार केवळ जागते
विस्मृतीचे पटल विरुनी उसळु दे सारी मने ॥२॥

गाळुनी निज तेज जेव्हा पार्थ सरला मागुती
मंत्र गीतेच्या स्वरांनी चेतली त्याची मती
तीच वाणी केशवाची ऐकवावी एकदा
झिंगलेल्या भावनांना ठेवण्या जागे सदा
शक्ति दे घेण्या भरारी भासु दे जग ठेंगणे ॥३॥

पौरुषाचा मंत्रजागर आज घुमतो आगळा
आत्मघाती शांततेचा ध्यास लोपो पांगळा
रंगवी आम्हास देवी उसळत्या श्रद्धेतुनी
प्रिय ध्वजाच्या लहरीमधुनी ऐकू दे विजयध्वनी
शांत व्हाया वर हिमालय सागरा खेचून ने ॥४॥

### महाकाय पक्षी आणि 'देवदूत'चे स्मरण

तरुण भारतात नुकतीच ''७० लाख वर्षांपूर्वी होता ७० किलोंचा महाकाय पक्षी'' ही बातमी वाचली. यावरून आपल्या नागपूरचेच महाकवी सुधाकर गायधनी यांच्या 'देवदूत' या महाकाव्याची आठवण झाली. प्रकाशित देवदूतमध्ये गायधनींनी अशाच एका महाकाय पक्ष्याची कल्पना १९८१ साली केलेली आहे. आपल्याकडे म्हण आहे की ''जे न देखे रवी, ते देखे कवी.'' त्याचाच प्रत्यय पुन्हा एकदा या बातमीच्या निमित्ताने आलेला दिसतो. पुन्हा एकदा म्हणायचे कारण म्हणजे अमेरिकेतील स्मिथसोनियन इन्स्टिट्यूशनच्या शास्त्रज्ञांना १९८७ मध्ये अमेरिकेच्या साऊथ करोलीना भागातील उत्खननात अशाच प्रकारच्या महाकाय समुद्र पक्ष्याचा सांगाडा सापडला होता. ही बातमी नागपूरच्या एका दैनिकात नोव्हेंबर १९८७ मध्ये प्रकाशित झाली. त्याही वेळेस त्या दैनिकात प्रकाशित झालेल्या माझ्या पत्रात त्या प्राचीन महाकाय पक्ष्याचे सतत सागरावरील हवेत तरंगत राहणे वगैरे साधर्म्य गायधनींच्या देवदूतमधे यापूर्वीच कसे कल्पिले आहे ते दाखवून दिले होते. गायधनींनी ते पत्र आणि इंग्रजीत प्रकाशित देवदूतचे काही संबंधित अंश स्मिथसोनियनला पाठवून दिले होते. ते सर्व तपासून या संस्थेने गायधनींना दोन पत्रे पाठवून आणि ते साधर्म्य मान्य करून गायधनींचे अभिनंदन केले होते. त्यात गायधनी यांची कवी कल्पना आणि विज्ञानाचा असा अभूतपूर्व संयोग जुळून आल्याचे म्हटले होते. आपणा समस्त नागपूरवासीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे की सुधाकर गायधनी यांचे देवदूत या महाकाव्यासह त्यांच्या अनेक कविता जगातील पस्तीस भाषांमध्ये अनुवादित होऊन प्रकाशित झालेल्या आहेत. जगातील विविध भाषांच्या अनेक मातब्बर समीक्षक, जाणकार साहित्यिक व वाचकांनी देवदूतचे प्रचंड स्वागत केले असून अमेरिकन समीक्षक व्लादिमिर डोलगाव्ह यांनी तर देवदूत हे होमर आणि मिल्टनच्या पुढे निघून गेल्याचे एका प्रकाशित लेखातून विशद केले आहे.

**प्रा. सुरेश खेडकर**/नागपूर

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिकांनो, हे करून पाहा

ज्येष्ठ नागरिकांसाठी एक खास गोष्ट आहे. हे करून पाहा. घरात खूप माणसे असूनही ज्येष्ठांना वेळ कसा घालवावा, हा प्रश्न असतो. बुद्धीचा वापर होईल. काय करायचे की एक शब्द घ्यायचा जसे शेवट टे. येणारी आडनावे. घटाटे, रघटाटे, भाटे, माटे, थोटे, घाटे, सोटे अशी पटापट आठवायची. तर आपल्याशीच शब्दांच्या भेंड्या खेळायच्या. काम नंतर माठ, ठुसी, सरबत, तलवार, रथ. असे शेवटच्या शब्दानंतरचा शब्द असे करायचे. तुम्ही कट्ट्यावर जात असाल तर तिथे करता येईल. पण एकटं असताना वेळ जाण्यासाठी खूप छान आहे. झोपल्या झोपल्या मन रमवता येते. लिहायला जमत असेल तर एक वही करा. त्यात लिहू शकता. सगळ्यात महत्त्वाचे की खूप ताण न देता स्मृती चांगली राहते. हा एक व्यायामच समजा. कंटाळा आला की बंद करायचे.



आपल्याला काही आठवणी नको असतात. पण काही आठवावे अशी इच्छा असते ते आठवत नसेल तर हे केल्याने नक्की आठवेल. करून पाहा. याशिवाय आणखी काही नवीन करू शकाल. विशिष्ट वयानंतर सारखे तुम्हाला कोणी वेळ देत नाही. ते आपापल्या कामात असतात. तक्रार न करता असा वेळ घालवा.

**अंजली पळणीटकर**/८७८०४९२११०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### एकात्म मानव दर्शनमध्ये विश्व कल्याणाचा विचार- प्रसाद जोशी



**मानवत,/प्रतिनिधी :** पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी सांगितलेल्या एकात्म मानव दर्शन विचारात विश्वकल्याणाचा विचार सांगितला आहे, असे प्रतिपादन प्रसाद जोशी यांनी केले.

दि. २७ रोजी तालुक्यातील सावळी येथे के. के. एम. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात एकात्म मानव दर्शन या विषयावर ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर डॉ. पंडित लांडगे, प्रा. गजानन अंबेकर, प्रा. प्रदीप गिरासे, गणेश उबाळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. एस. आर. राठी, प्रा. एस.जे. कुकडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जोशी यांनी सांगितले की, पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी संपूर्ण देशाचा अभ्यास करून चिंतन केले आणि त्यामधून एकात्म मानव दर्शन हा विचार शब्दबद्ध केला. यामध्ये देशासमोरील समस्या सोडवण्याचा मार्ग सांगितला आहे. व्यक्ती, परिवार, समाज आणि राष्ट्राचा विकास यामधील एक समान धागा सांगितला आहे. तसेच एकात्म मानव दर्शनमध्ये अंत्योदय विकासाची संकल्पना मांडण्यात आली आहे.समाजाच्या शेवटच्या घटकाचा सामाजिक, आर्थिक विकास झाला पाहिजे. यासाठी त्यांना संधी मिळाली पाहिजे.

यावेळी प्रा. डॉ. पंडित लांडगे यांनी लोकशाही आणि आपली जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले. लोकशाहीने अधिकार दिलेले आहेत तसेच कर्तव्यही सांगितले आहेत. देशाचा नागरिक म्हणून आपण या कर्तव्याचे पालन केले पाहिजे.

### के. के. एम महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख जयंती उत्साहात साजरी




**मानवत,/प्रतिनिधी :** के. के. एम महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर मुंडे, प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सहसचिव श्री विजयकुमार दलाल, उपप्राचार्य डॉ. के. जी. हुगे,मूल्य शिक्षण समिती प्रमुख डॉ.पंडित लांडगे संयोजक डॉ. सचिन चोबे, डॉ. पंकज चाळीकवार उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार डॉ.सचिन चोबे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी कर्मचारी उपस्थित होते.

### संगणक परिचालकांचे काम बंद आंदोलन

ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे मानधन थकले




**सोनपेठ,/प्रतिनिधी-** शासनाच्या विविध ऑनलाइन सेवा सुरळीत चालविण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या ग्रामपंचायतींच्या संगणक परिचालकांचे मागील चार महिन्यांपासून मानधन रखडले आहे. नियमितपणे काम करूनही हातात पैसे पडत नसल्याने सोनपेठ तालुक्यातील संगणक परिचालकांचे काम बंद आंदोलन सुरू आहे. त्यामुळे तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतीचा कारभार ऑफलाईन सुरू आहे.

ग्रामपंचायत मधील जन्म-मृत्यू नोंद, विविह नोंदणी, रहिवासी दाखले, उत्पन्न, जातप्रमाणपत्र, विविध योजना अर्ज, ई-केवायसी, ऑनलाइन फॉर्म भरणे आदी महत्त्वाच्या सेवा संगणक परिचालकांच्या माध्यमातून ऑनलाईन दिल्या जातात. परंतु अशा प्रकारचे महत्त्वाचे कामे करणाऱ्या संगणक परिचालकांचे मानधन वेळेवर न मिळणे ही मोठी विसंगती असल्याची भावना परिचालकांमध्ये आहे. मानधन हाती पडत नसल्याने संगणक परिचालकांची आर्थिक अडचण होत असून, त्यांना गरजा भागविण्यासाठी उधार-उसनवारी करावी लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सोनपेठ तालुक्यातील संघटनेकडून देण्यात आला आहे.मागील दिवाळी, दसरा यांसारख्या सणासुदीच्या काळातही संगणक परिचालकांची पगार वेळेवर झाली नाही. संगणक परिचालकांना मासिक स्वरूपात १० हजार रुपये इतके मानधन दिले जाते.तालुक्यातील ग्रामपंचायतीत कार्यरत संगणक परिचालकांना मिळणारे मानधन हे तुटपुंजे असून तेही वेळेवर मिळत नसल्याने त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनामुळे नागरिकांचे दाखले, अर्ज, नोंदी आदी कामे खोळंबली आहेत.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू -** शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# गुणवत्तापूर्ण शिक्षणातून घडतो जागतिक विद्यार्थी- डॉ.रोडगे

## सेलूत अराऊंड द ग्लोय थीमयर प्रिन्स इंग्लिश स्कुलचा भव्य सांस्कृतीक कार्यक्रम उत्साहात संपन्न




**सेलू,/प्रतिनिधी-** श्रीराम प्रतिष्ठान, सेलू आयोजित सुरभी महोत्सव २०२५ अंतर्गत एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल, सेलू यांचा ''अराउंड द ग्लोब'' या संकल्पनेवर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम दि. २७ डिसेंबर, शनिवार रोजी सॅनरो नॉलेज सिटी, रवळगाव रोड, सेलू येथे मोठ्या थाटामाटात पार पडला.

जगातील विविध देशांची संस्कृती, परंपरा, नृत्यशैली व वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रंगतदार नृत्याविष्कारांतून प्रभावीपणे उलगडून दाखविण्यात आली. भारत, स्पेन, जपान, चीन, आफ्रिका, सौदी अरेबिया, इजिप्त, ब्राझील, अमेरिका आदी देशांच्या सांस्कृतिक नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सुसूत्रता व सादरीकरणातील वैविध्य विशेष लक्षवेधी ठरले. कार्यक्रमात बोलताना श्रीराम प्रतिष्ठान, सेलूचे अध्यक्ष व कार्यक्रमाध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी शाळेमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड, डॉ. होमी भाभा परीक्षा, क्रीडा स्पर्धा, विज्ञान सेमिनार व विज्ञान प्रदर्शनांमध्ये मिळवलेले यश हे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे द्योतक असल्याचे त्यांनी सांगितले. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून जागतिक स्तरावर सक्षम विद्यार्थी घडविण्याचा शाळेचा संकल्प असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मंचावर संस्थेच्या सचिव डॉ. सविता रोडगे, डॉ. आदित्य रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, शाळेचे मुख्याध्यापक कार्तिक रत्नाला, प्रगती क्षीरसागर, कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलूचे संचालक ॲड. दत्ताराव कदम, अनिल पवार, अजय डासाळकर, केशव सोळंके, जिल्हा उपाध्यक्ष भाजपा डॉ. ऋतुराज साडेगावकर, शहराध्यक्ष भाजपा अशोक शेलार, महिला तालुका अध्यक्ष भाजपा सारिका पारवे, मोहन बोराडे (दैनिक लोकमत), शिवाजी शिंदे (दैनिक एकजूट), प्रफुल्ल विनायके, डॉ. अशोक नाईक, नवरे, विशाल काला, संजय परतानी, कृष्णा काटे, सुयश पटवारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रगती क्षीरसागर यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन कल्पना भाबट यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक कार्तिक रत्नाला यांनी केले. यावेळी सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ॲड. दत्ताराव कदम यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता, शिस्तबद्ध वातावरण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीबाबत मनःपूर्वक कौतुक केले. या कार्यक्रमात प्रिन्स ऑफ द स्कूल म्हणून दहावीतील विद्यार्थी उज्ज्वल नारायण निकम व प्रिन्सेस ऑफ द स्कूल म्हणून तनिष्का अनंत तेलभरे यांची निवड करण्यात आली. हा सन्मान मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या इतर गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सेलू, मंठा, पाथरी, मानवत व जिंतूर तालुक्यातील पालकवर्ग व रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने संपूर्ण परिसर आनंदोत्सवाच्या वातावरणात न्हाऊन निघाला.

### सिमकार्ड व रिचार्ज ५ जी पण नेटवर्क ४ जी सोनपेठ तालुक्यातील प्रिपेडवर वापरकर्ते नाराज

**सोनपेठ/प्रतिनिधी-** ५ जी नेटवर्क चा आनंद घ्या म्हणून कंपनीने आपले प्रीपेड चे मोबाईल सिम कार्ड सोनपेठ तालुक्यात मोठ्या प्रमाणात विक्री केले आहेत. अनेकांनी इतर कंपनीला ना पसंती देत पसंत करून आपले मोबाईल नंबर त्यामध्ये स्थलांतर केले आहेत. त्यामुळे सोनपेठ शहरासह तालुक्यातील प्रीपेड च्या ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या कंपनीने आपले प्रीपेड कार्ड जरी ५जी नेटवर्क चे सांगितले असले तरी, त्याची इंटरनेट स्पीड मात्र ४ जी अनुभवायला मिळत असल्याने वापरकर्त्यांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सध्याच्या युगात स्मार्टफोन आणि इंटरनेट सेवा ही प्रत्येक नागरिकाची गरज झाली आहे. काळाच्या ओघात अनेक नागरिकांनी आपल्याकडील साधा मोबाईल फोन बदलून स्मार्टफोन खरेदी केले आहेत. त्यामध्ये इंटरनेटच्या जोरावर चालणारे व्हाट्सअप, फेसबुक, युट्युब, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियाचा वापर करून नागरिक आनंद घेत आहेत. तर विविध बँकांच्या ॲप बरोबरच फोन पे, गुगल पे च्या वापर कर्त्यांची संख्या ही लक्षणीय आहे. आणि ई पीक पाहणी, क्रॉप इन्शुरन्स या सारखे विविध ॲप वापरण्यास शासनाने भाग पाडले आहे. यासाठी ५०% पेक्षा जास्त नागरिकांकडे आज स्मार्टफोन दिसून येत आहेत. सिमकार्ड पुरविणाऱ्या कंपन्यांनी सुरुवातीला टूजी, थ्रीजी, फोरजी अशा प्रकारची इंटरनेटची सेवा दिली. त्यानंतर सध्या ५ जी ची हवा सुरू आहे. यावेळी सर्वच कंपनीने स्पर्धेच्या काळात टिकून नागरिकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी ५ सेवा सुरू केली आहे. सध्या सोनपेठ शहरासह तालुक्यात सर्वत्र ईतर कंपन्यांची ५ जी सेवा सुरू असून, मात्र यापासून वंचित राहिली आहे. सर्व कंपन्याएवढेच महिन्याचे ५ जी रिचार्ज शुल्क घेऊन कंपनी ही ४ जी सेवा देत आहे. या कंपनीमध्ये प्रामुख्याने आयडिया आणि वोडाफोन कंपनी समाविष्ट आहेत. या दोन्ही कंपन्यांचे सिम कार्ड धारक इंटरनेट ला वैतागले असून आपला मोबाईल नंबर सोबत घेऊन ते इतर कंपनीमध्ये स्थलांतर करताना दिसून येत आहेत. त्यामुळे महिन्याच्या रिचार्ज चा पुरेपूर मोबदला देऊनही कडून ५ जी सेवा मिळत नसल्यामुळे सोनपेठ शहरासह तालुक्यातील नागरिक वैतागले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## जिंतूर पालिकेत राठोड यांना उपनगराध्यक्षपद देण्याची मागणी

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर नगरपरिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता प्रस्थापित केली आहे. या निवडणुकीत राजेश राठोड हे सलग चौथ्यांदा नगरसेवक म्हणून गेल्या वीस वर्षापासून माजी आमदार रामप्रसाद जी बोर्डीकर तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरेयांचे खांदे समर्थक व बोर्डीकर कुटुंबात आहोरात्र झटणारे तथा एकनिष्ठ राहून या निवडणुकीत स्पष्ट बहुमत राजेश राठोड हे निवडून आले असून, जिंतूर नगरपरिषदेत बंजारा समाजाचे ते एकमेव लोकप्रतिनिधी आहेत. मात्र, आजवर नगरपरिषदेत मराठा, मुस्लिम तसेच इतर समाजातील प्रतिनिधींना नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांसारखी महत्त्वाची पदे मिळाली असताना बंजारा समाजाला मात्र कायमच वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप होत आहे.

बंजारा समाज हा जिंतूर शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाचा अविभाज्य घटक आहे. निवडणुकांमध्ये या समाजाने नेहमीच सक्रिय सहभाग घेतला असून विविध पक्षांच्या विजयात मोलाची भूमिका बजावली आहे. तरीसुद्धा सत्तास्थापन झाल्यानंतर पदवाटपाच्या वेळी बंजारा समाजाकडे दुर्लक्ष केले जात असल्याची भावना समाजबांधवांमध्ये तीव्र होत चालली आहे. हा प्रकार केवळ एका समाजावर होणारा अन्याय नसून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच हरताळ फासणारा असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. या पार्श्वभूमीवर बंजारा समाजाच्या वतीने ठाम भूमिका घेतली आहे. जिंतूर नगरपरिषदेत समतोल व न्याय्य प्रतिनिधित्व होण्यासाठी राजेश राठोड यांना उपनगराध्यक्षपद देण्यात



यावे, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली आहे. राजेश राठोड यांची प्रतिमा स्वच्छ असून ते कामाशी प्रामाणिक, सर्वसामान्यांशी थेट संवाद ठेवणारे आणि विकासकामांमध्ये सक्रिय असलेले लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. अशा अनुभवी व लोकप्रिय नगरसेवकाला जबाबदारीची संधी देणे हे शहराच्या विकासाच्या दृष्टीनेही हिताचे ठरेल, असे मत व्यक्त होत आहे. लोकशाही व्यवस्थेत सर्व समाजांना सत्तेत योग्य सहभाग मिळणे आवश्यक असून, बंजारा समाजाला डावलण्याची परंपरा आता थांबवली पाहिजे, अशी भावना जिंतूर शहरात जोर धरू लागली आहे.

सत्ताधारी पक्ष व नगरपरिषद प्रशासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा बंजारा समाजात असंतोष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे संकेतही देण्यात येत आहेत. जिंतूर विधानसभा मतदारसंघात बंजारा समाज सर्वात जास्त आहे व बोर्डीकर कुटुंबावर सर्वात जास्त प्रेम करणारा बोर्डीकर साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा बंजारा समाजातून या निवडणुकीत भाजपचे राजेश राठोड हे भरघोस मतांनी निवडून आले आहेत तरी त्यांना उपनगराध्यक्ष पद हे देण्यात यावे अशी मागणी बंजारा समाजाची होत आहे

## भारतीय जनता पक्षाच्या परभणी उपजिल्हाध्यक्षपदी अविनाश काळे यांची निवड



**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यातील देवसडी येथील रहिवासी असलेले तथा आडगाव सर्कलचे माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश काळे यांची भारतीय जनता पार्टीच्या परभणी जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आलेली आहे.

परभणी येथे एका कार्यक्रम परभणी जिल्ह्याचे भाजपचे ज्येष्ठ नेते तथा जिंतूर चे माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली या बैठकीत देवसडी येथील सुपुत्र आणि आवीनाशराव काळे यांची भारतीय जनता पार्टीच्या परभणी जिल्हा उपअध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे अविनाश राव काळे यांचा ग्रामीण भागात खूप मोठा संपर्क असल्यामुळे त्यांना भाजपचे उपजिल्हाध्यक्ष पद हे देण्यात आले आहे निवड झाल्याच्या नंतर बोलताना अविनाश राव म्हणाले की मी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आणि परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांनी माझ्यावर जिम्मेदारी टाकली ती जिम्मेदारी मी यशस्वीरित्या पार पाडणार तसेच भारतीय जनता पार्टीचे विचार तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत नेणार आणि शासनाच्या विविध योजना शेवटचा माणसापर्यंत अमलात आणण्याचे काम करणार पक्षाने जी माझ्यावर जिम्मेदारी टाकली त्याला मी कुठल्याही प्रकारचा तडा जाऊ देणार नाही असे ते म्हणाले.

यावेळी निवडीचे पत्र देताना परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर वभारतीय जनता पार्टीचे परभणी जिल्ह्याचे नेते रामप्रसादजी बोर्डीकर साहेब परभणी जिल्हा भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश रावजी भुमरे साहेब माजी जिल्हा परिषद सदस्य नानासाहेब राऊत बोरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र नागरे माजी जिल्हा परिषद सदस्य काकडे साहेब व भाजपचे इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांची निवड होतात जिंतूर शहर व त्यांच्या निवडीचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

## सप्तशक्ती संगम पुरस्काराने उषाताई चिनके सन्मानित

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** शहरातील सामाजिक,धार्मिक व सेवाभावी कार्यात सातत्याने योगदान देणाऱ्या उषाताई चिनके यांना सरस्वती शिशु वाटिका व बालविकास केंद्र, गंगाखेड यांच्या वतीने सप्तशक्ती संगम पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. (दिनांक २८ डिसेंबर रविवार) रोजी सरस्वती शिशु वाटिका व बालविकास केंद्राच्या वतीने सप्तशक्ती संगम हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेच्या संचालिका व प्रधानाचार्य संगीताताई भिसे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाची भूमिका मांडली.महिलांच्या विविध क्षेत्रातील कार्याचा गौरव व्हावा,त्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उषाताई चिनके,गयाबाई पोळ, आशाताई फड,गोदावरी स्वच्छता अभियानच्या ॲड.स्मिता देशमुख व त्यांची संपूर्ण टीम,डॉ.शोभा कदम,इंदुमती कदम,पुष्पाताई मुंडे,डॉ.मंजुषाताई जामगे आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमात वक्त्या म्हणून विना



मांडाखळीकर व अभिलाषा संगई यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर प्रेरणादायी विचार मांडले.या सप्तशक्ती संगम कार्यक्रमांतर्गत शहरातील धार्मिक,सामाजिक, शैक्षणिक,पर्यावरण, आरोग्य व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सात महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

धार्मिक व सामाजिक कार्यासाठी उषाताई चिनके,योग क्षेत्रात योगदानासाठी डॉ.मंजुषाताई जामगे व डॉ.प्रतिमा वाघमारे,आदर्श मातृत्वाबद्दल गयाबाई पोळ,पर्यावरण संरक्षणासाठी पुष्पाताई मुंडे,शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी इंदुमती कदम,तर धाडसी कार्याचा आदर्श निर्माण करणाऱ्या शहरातील प्रथम महिला बस चालक आशाताई फड यांना सप्तशक्ती संगम सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिलांनी आपल्या जीवनातील अनुभव सांगून समाजासाठी कार्य करण्याचा संदेश दिला.या कार्यक्रमाला शहरातील माता-पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सरस्वती शिशु वाटिका व बालविकास केंद्राच्या शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ऐतिहासिक विक्रम! आवरगावात अवघ्या एका तासात १००० वृक्षांची लागवड

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत 'पर्यावरणपूरक' पाऊल; आमदार प्रकाश सोळंके यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.२९ डिसेंबर**

पर्यावरण संवर्धनाचा केवळ नारा न देता प्रत्यक्ष कृतीतून आदर्श निर्माण करत, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत आवरगाव येथे एका तासात तब्बल १००० वृक्षांची लागवड करण्यात आली. आवरगावकर सेवाभावी संस्था आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या ऐतिहासिक उपक्रमाने संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले आहे.



लोकसहभागातून निसर्गाची सेवा

या भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्घाटन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते नारळाचे रोप लावून करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी आवरगावच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि पर्यावरण रक्षणासाठी असा लोकसहभाग काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी धारूर नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा. बाळासाहेब जाधव, धारूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. वैजनाथ लोखंडे, विस्तार अधिकारी श्री. राऊत साहेब, श्री. बाभले साहेब यांच्यासह धारूर नगर परिषदेचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, तालुक्यातील सरपंच आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्मशानभूमी होणार 'नंदनवन'

गावातील स्मशानभूमी परिसराचा कायापालट करण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये केवळ शोभेची झाडे न लावता, शाश्वत उत्पन्नाची आणि सावलीची चिकू, आंबा, मोसंबी, डाळिंब यांसारखी १००० फळझाडे लावण्यात आली. यामुळे भविष्यात हा परिसर हिरवागार होऊन एक आदर्श स्मृती उद्यान म्हणून नावारूपास येईल.

नियोजनबद्ध यश

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श सरपंच अमोल जगताप यांनी केले. त्यांनी या मोहिमेमागील उद्देश स्पष्ट करत ग्रामस्थांच्या एकजुटीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे यांनी मानले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपसरपंच नवनाथ नखाते, सर्व ग्रामपंचायत सदस्य, आवरगावकर सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी, महिला, लहान मुले आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. सामूहिक प्रयत्नांतून अवघ्या तासाभरात पार पडलेला हा सोहळा पर्यावरण प्रेमींसाठी प्रेरणादायी ठरला आहे.विशेष आकर्षण: स्थानिक महिला आणि शाळकरी मुलांचा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.मी या बातमीचा सोशल मीडियासाठी एक छोटा आणि आकर्षक 'कॅप्शन' (Caption) तयार करून देऊ का?

# किल्ले धारूरच्या विकासाला मिळणार गती; नवनियुक्त नगराध्यक्षांचा पदभार स्वीकारताच ॲक्शन मोड'!

## मार्च अखेरपर्यंत नवीन पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट; आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत विकासकामांचा धडाका

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.२९ डिसेंबर**

धारूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवनियुक्त नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी पदभार स्वीकारताच कामाचा धडाका सुरू केला आहे. आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषदेची महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली असून, यामध्ये पाणीपुरवठा, स्वच्छता आणि हद्दवाढीसह अनेक महत्वाच्या योजनांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.



पाणीपुरवठा योजना मार्चपर्यंत पूर्ण होणार

शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या नवनिर्मित पाणीपुरवठा योजनेचा बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. ही योजना मार्च अखेरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यादृष्टीने फेब्रुवारी महिन्यापर्यंत नळ कनेक्शन आणि पाईपलाईनची सर्व कामे पूर्ण करण्याच्या कडक सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

अपूर्ण सभागृहे आणि स्वच्छतेवर भर

कसबा व धनगर वाडा येथील अपूर्ण अवस्थेत असलेली सभागृहांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. तसेच, 'स्वच्छ धारूर, सुंदर धारूर' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून शहराच्या घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर आराखडा तयार करण्यास सांगण्यात आले आहे. संपूर्ण शहर कचरामुक्त करण्यासाठी प्रशासनाला कडक पावले उचलण्याचे आदेश नगराध्यक्षांनी दिले आहेत.

नगरपरिषद हद्दवाढ आणि घरकुल प्रश्न

शहराच्या विस्तारासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या नगरपरिषद हद्दवाढीबाबतची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून कामाला सुरुवात करण्यावर बैठकीत एकमत झाले. याशिवाय, ग्रीन झोनमध्ये असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना बांधकाम परवाने देताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

नागरिकांना मिळणार हक्काचा पी.टी.आर.

भोगवटा धारक नागरिकांना त्यांच्या हक्काचा पी.टी.आर. (झठठ) मिळावा यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून त्वरित कार्यवाही करण्याचे बैठकीत ठरले. यामुळे शहरातील अनेक मालमत्ता धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

प्रमुख उपस्थिती

या बैठकीस आमदार प्रकाश दादा सोळंके, नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, मुख्याधिकारी, सर्व नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरपरिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारताच घेतलेल्या या आक्रमक निर्णयामुळे शहरवासियांमध्ये आनंदाचे वातावरण असून विकासाला नवी दिशा मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

# विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी संभाषण कौशल्य विकसित करावे-डॉ.भाऊसाहेब नळे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ डिसेंबर**

विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी संभाषण कौशल्य विकसित करावे असे प्रतिपादन डॉ. भाऊसाहेब नळे यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने आयोजित संभाषण कौशल्य या एक दिवशी कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन, लेखन,भाषण या कौशल्याचा विकास करावयास हवा. विद्यार्थ्यांनी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर जेव्हा वेगवेगळ्या ठिकाणी आपण मुलाखतीत जाता तेव्हा तुमच्यातील ही कौशल्य तपासली जातात आणि त्या कौशल्याच्या बळावरच तुम्हाला रोजगार मिळतो. त्यामध्येच संभाषण कौशल्य हे खूप महत्त्वाचे आहे. ज्याचे बोलणे योग्य व मुद्देसूद असते तो विद्यार्थी कोणत्याही ठिकाणी कमी पडत नाही. संभाषण कौशल्य ही आपल्या व्यक्तिमत्त्वाची चुणूक असते. आज जगामध्ये ज्या लोकांनी आपले नाव कमावले आहे ते त्यांच्या संभाषण कौशल्याच्या जीवावरच. म्हणूनच म्हटले जाते की जो बोलतो त्याचे काहीही विकले जाते. आणि आपण जर बोललोच नाहीत किंवा व्यक्तच नाही झालो तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा देखील विकास होणार नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी भविष्यात येणाऱ्या संधीला सामोरे जाण्यासाठी संभाषण कौशल्य विकसित करावयास हवे असे ते म्हणाले.



अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना म्हणाले की, हिंदी विभागाने जी संभाषण कौशल्य ही कार्यशाळा आयोजित केली आहे ती विद्यार्थ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी अशी आहे. कारण भविष्यात संभाषण कौशल्याच्या जीवावरच आपण योग्य ती संधी प्राप्त करणार आहात. आणि ही संधी कशी प्राप्त करावी याचे ज्ञान या कार्यशाळेमधून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. म्हणून तुमचे संभाषण कौशल्य जर तुम्ही विकसित केले तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा तो आरसा असेल. म्हणून संभाषण कौशल्याच्या जीवावरच आपण वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भविष्यात यश संपादन करू शकाल असे ते म्हणाले.

या एक दिवशीय कार्यशाळेचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. युवराज मुळये यांनी केले. सूत्रसंचालन हिंदी विभागातील डॉ. राजाराम जाधव यांनी केले. तर आभार प्रा. परमेश्वर पवार यांनी मानले. या कार्यशाळेसाठी हिंदी विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# नवीन वर्षाची सुरुवात हरिनामाने ३१ डिसेंबर ते १० जानेवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्य कीर्तन महोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ डिसेंबर**

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वोत्तम संस्कृती असून तिचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण टाळावे या उद्देशाने गेल्या २५ वर्षांपासून बीड शहरात हॅपी न्यू इयर भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून साजरा केला जात आहे. याच परंपरेनुसार यावर्षीही ३१ डिसेंबर ते १० जानेवारी या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अकरा दिवसीय महोत्सवात सकाळी ११ ते ४ या वेळेत पाच दिवस तीर्थ महात्म्य कथा संपन्न होणार असून, महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेरील पवित्र तीर्थक्षेत्रांचे महात्म्य या कथांमधून उलगडले जाणार आहे. या कथा साध्वी ह.भ.प. वैभवी श्रीजी (वृंदावन धाम) सादर करणार आहेत.तसेच सायंकाळी ४ ते रात्री ९ या वेळेत पाच दिवस चाणक्य नीति कथा होणार असून, दैनंदिन व सांसारिक जीवनात मार्गदर्शक ठरणाऱ्या या कथांचे निरूपण ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे (सेलू, परभणी करणार आहेत. यानंतर महाराष्ट्रातील ख्यातनाम आठ सांप्रदायिक कीर्तनकार आपली कीर्तन सेवा सादर करणार आहेत.या महोत्सवाची सुरुवात ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार असून, बीड शहर व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी सहकुटुंब, सहपरिवार व मित्रपरिवारासह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हा संपूर्ण कीर्तन महोत्सव बीड व अहिल्यानगर जिल्हे मोतीबिंदू मुक्त करण्याचा संकल्प करणारे सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. अशोक महाडिक यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आला आहे. डॉ. महाडिक यांनी आनंदऋषीजी नेत्रालयाच्या माध्यमातून अवघ्या ८ वर्षांत १ लाख १९ हजार नेत्रशस्त्रक्रिया करून असंख्य आजी-आजोबांचे जीवन प्रकाशमान व सुखकर केले आहे. अशा कर्तृत्ववान समाजसेवक डॉक्टरांच्या सन्मानार्थ हा कीर्तन महोत्सव समस्त बीडकरांच्या वतीने त्यांना समर्पित करण्यात येत आहे.

# सारा तेंडुलकर बनली पीएनजीच्या 'लाइटस्टाईल'ची ब्रँड ॲम्बेसेडर

**तभा वृत्तसेवा**
**कोल्हापूर दि.२९ डिसेंबर**

भारतातील सुवर्णालंकारांच्या क्षेत्रातील प्रतिष्ठित नाव असलेल्या पीएनजी ज्वेलर्सने आपल्या 'लाइटस्टाईल बाय पीएनजी' या समकालीन ब्रँडच्या विस्तारासाठी मोठी घोषणा केली आहे. या आधुनिक आणि हलक्या वजनाच्या दागिन्यांच्या ब्रँडने प्रसिद्ध युवा आयकॉन सारा तेंडुलकरला आपली नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले असून, या माध्यमातून ब्रँडने तरुण पिढीशी नाते अधिक घट्ट करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

जवळपास दोनशे वर्षांची परंपरा असलेल्या पीएनजी ज्वेलर्सने बदलत्या काळानुसार आपली ओळख जपतानाच भविष्यातील ग्राहकांसाठी 'लाइटस्टाईल' ही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांनी या महत्त्वपूर्ण बदलावर भाष्य करताना सांगितले की, 'लाइटस्टाईल' ही केवळ तात्पुरती फॅशन नसून तो पीएनजी अंतर्गत एक जाणीवपूर्वक उभारलेला स्वतंत्र ब्रँड आहे. आजच्या तरुण पिढीची खरेदी करण्याची पद्धत आणि त्यांची अभिव्यक्ती पूर्णपणे वेगळी असून, त्यांना दैनंदिन जीवनात वापरता येतील असे समकालीन डिझाइन्स देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुण्यात आणि गोव्यात या स्टोअर्सना मिळालेल्या प्रचंड प्रतिसादानंतर आता आम्ही हा ब्रँड राष्ट्रीय स्तरावर नेण्यास सज्ज आहोत.



सारा तेंडुलकरची निवड करण्यामागे तिची साधी आणि तितकीच आधुनिक जीवनशैली हे मुख्य कारण आहे. सोशल मीडियावर कोट्यवधींच्या पसंतीस उतरलेली सारा आता या ब्रँडच्या विविध जाहिरात मोहिमा, डिजिटल उपक्रम आणि स्टोअर लॉन्चिंगमध्ये सक्रिय सहभाग नोंदवणार आहे.

या सहयोगाबद्दल आनंद व्यक्त करताना साराने म्हटले की, 'लाइटस्टाईल'ची ज्वेलरी ही नैसर्गिक सहजता प्रतिबिंबित करते, जी माझ्या वैयक्तिक स्टाईलशी पूर्णपणे जुळणारी आहे. दरम्यान, पीएनजी ज्वेलर्सने आपल्या विस्ताराचा आराखडाही स्पष्ट केला असून, आर्थिक वर्ष २०२८ पर्यंत महाराष्ट्र आणि देशाच्या इतर भागांत एकूण ५० नवी स्टोअर्स उघडण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. सारा तेंडुलकरचा समावेश असलेले विशेष कलेक्शन मार्च २०२६ पासून ग्राहकांसाठी उपलब्ध होणार असून, यामुळे दागिन्यांच्या बाजारात एक नवा ट्रेंड निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मोरगावला बांधावर उतरल प्रशासन : बैठक व आढावा

## तहसीलदार शेळके यांनी गावातील अतिक्रमणासोबतच शेतातील रस्त्याची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ डिसेंबर**

मांजरसुंबा महसूल मंडळातील मौजे मोरगाव येथे सोमवार दिनांक २९ रोजी प्रशासन प्रत्यक्ष गावात उतरल्याचा अनुभव नागरिकांना मिळाला . हा अनुभव केवळ बैठकीपुरता मर्यादित न राहता , थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन समस्या पाहण्याचा आणि त्या सोडवण्याचा ठरला . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मोरगाव येथे गावातील अतिक्रमण , शेतातील रस्ते , तसेच नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची जागेवर पाहणी करत प्रशासनाची लोकाभिमुख भूमिका स्पष्ट केली .



ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेली मंडळ स्तरीय आढावा बैठक ही नेहमीच्या सरकारी औपचारिकतेपेक्षा वेगळी ठरली . शेतकरी , महिला , वृद्ध , तरुण , लोकप्रतिनिधी आणि अधिकारी एकाच छताखाली बसून थेट संवाद साधताना दिसले . कुणाच्या हातात अर्ज होते , कुणाच्या डोळ्यात प्रश्न होते , तर कुणाच्या मनात केवळ अपेक्षा होती की आज तरी आपली अडचण ऐकली जाईल .

प्रशासन गावाकडे ही संकल्पना मोरगावमध्ये कागदावर नव्हे , तर प्रत्यक्ष कृतीत उतरलेली दिसली . राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार प्रशासन लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे , समस्या कार्यालयात नव्हे तर जागेवर सुटल्या पाहिजेत , हा संदेश शासनाने ठामपणे दिला आहे . त्याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल यंत्रणा गावपातळीवर सक्रिय झाली आहे . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सातत्याने दिलेला सेवा ही कागदात नाही , तर माणसाच्या आयुष्यात दिसली पाहिजे हा संदेश मोरगावच्या कारवाईत प्रत्यक्षात उतरल्याचे चित्र दिसले . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी वेळोवेळी घेतलेल्या आढाव्याचा ठसा या संपूर्ण प्रक्रियेत जाणवत होता .

या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . मात्र त्यांनी फक्त सभागृहात बसून तक्रारी ऐकून घेणे इतक्यावर न थांबता , नागरिकांनी मांडलेल्या अतिक्रमणाच्या तक्रारी आणि शेतातील रस्त्याच्या समस्यांबाबत थेट जागेवर जाऊन पाहणी केली . गोविंद जाधव आणि सुंदर भड यांनी रस्त्याची समस्या मांडताच तहसीलदार शेळके यांनी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसह शेतातील रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली . रस्ता खुला करून दिला जाईल आणि अडथळे दूर करण्यात येतील , अशी ठाम हमी त्यांनी गावकऱ्यांना दिली .


पाणी , शेती , महसूल दाखले , ओळखपत्रे , शासकीय योजना , पीकविमा , ॲग्रीस्टॅक , जमीन विषयक प्रश्न यावर तहसीलदारांनी समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले . कुठे तात्काळ उपाय सुचवले , तर कुठे प्रक्रिया स्पष्ट करून पुढील कार्यवाहीची दिशा दाखवली . या संवादातून अनेक नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि दिलास्याची भावना दिसून आली .या आढावा बैठकीत ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण ओव्हाळ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली . यावेळी मंडळ अधिकारी श्रीमती सोनाली कदम , माणिक पांढरे , रेश्मा तानगे , आशा घाडगे , अविनाश माळवे , अनिल गायकवाड , ग्रामपंचायत अधिकारी कडू पाटील , सरपंच लता जाधव , उपसरपंच मोरगाव तसेच महसूल सेवक बिरलिंगे , काकडे उपस्थित होते . पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अडचणी थेट मांडल्या .या निमित्ताने विविध प्रमाणपत्रे , दाखले , ऊसतोड कामगार ओळखपत्र , धरणग्रस्त प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे थेट वाटप करण्यात आले . लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान हा या उपक्रमाचा खरा यशस्वी निष्कर्ष ठरला .बैठकीनंतर एका ज्येष्ठ ग्रामस्थाने भावूक होत सांगितले , आयुष्यात पहिल्यांदाच तहसीलदार आमच्या गावात येऊन आमच्याशी बसले आणि बांधावर जाऊन प्रश्न पाहिले . आज वाटतं सरकार खरंच जवळ आलं आहे . एका शेतकऱ्याने म्हटले , आधी कार्यालयात फेऱ्या माराव्या लागायच्या . आज मात्र प्रश्न सांगितला आणि लगेच जागेवर पाहणी झाली . या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्पष्ट केले की , शासनाचे आदेश , वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि स्थानिक पातळीवरील प्रामाणिक अंमलबजावणी या तिन्हींची सांगड घातली तरच सुशासन प्रत्यक्षात उतरते . प्रशासन म्हणजे फक्त फाईल्स नव्हेत , तर लोकांच्या आयुष्याशी जोडलेली जबाबदारी आहे , असे त्यांनी ठामपणे सांगितले .बैठकीच्या शेवटी ग्रामस्थांनी तहसीलदार शेळके तसेच संपूर्ण महसूल यंत्रणेचे आभार मानले . मोरगाव येथे झालेली ही पाहणी आणि बैठक प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करणारी ठरली असून , प्रशासन जर थेट गावात उतरले , तर समस्यांवर उपायही तिथेच सापडतात , हा विश्वास गावकऱ्यांमध्ये दृढ झाला आहे .



शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांची पत्नी नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या पतीचा सत्कार करतांना समाजसेवक विश्वास तांदळे दिसत आहेत.

# साई नगर, इलियास नगरचा आखाडा बाळापूरमध्ये समावेश करा

## रहिवाशांची जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
मागील १५ ते २० वर्षापासून आखाडा बाळापूर जवळील सर्व्हे क्रमांक १३४/१ मध्ये असणाऱ्या साई नगर आणि इलियास नगर महसुलीदृष्ट्या असल्यामुळे कागदपत्रांसाठी शेवाळा ग्रामपंचायतीमध्ये जावे लागत आहे. त्यामुळे रहिवाशांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या दोन्ही नगरातील रहिवाशांच्या सुविधेसाठी आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीमध्ये समावेश करावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.
साई नगर व इलियास नगर हे आखाडा बाळापूर शहराच्या अगदी नजीक आहेत. आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीकडून या नगरात रस्ते व इतर मुलभूत सुविधा पुरविल्या जातात मात्र या नगरांची नोंद ही शेवाळा ग्रामपंचायतीमध्ये आहे. महसुली दृष्ट्या हे दोन्ही नगर शेवाळा ग्रामपंचायतीमध्ये आहेत परंतु भौगोलिक दृष्ट्या आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीअंतर्गत येतात. मागील १५ ते २० वर्षापासून येथील रहिवाशी अनेक समस्यांना तोंड देत आहेत. घराची नोंद, नमुना नं ८, घर पट्टी, नळपट्टी, वीज आदीप्रकारचे कर शेवाळा ग्रामपंचायतीकडे भरणा करावी लागत आहेत. परंतु शेवाळा ग्रामपंचायत या परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, कचरा व्यवस्थापन, विद्युतीकरण आदी सोयीसुविधा पुरवित नसून या सुविधा आखाडा बाळापूर ग्रामपंचायत पुरवित आहे. वास्तव्य एका ग्रामपंचायतीत आणि प्रशासकीय काम दुसऱ्या ग्रामपंचायतमध्ये येत असल्यामुळे या नगरात सोयीसुविधा पूर्ण होण्यास अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे साई नगर व इलियास नगरचा समावेश आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीमध्ये करावा अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा रहिवाशांनी निवेदनाद्वारे दिला आहे.
निवेदनावर विजय बोंढारे, सचिन पेंढारकर, मजहर पठाण, विठ्ठल पंडित, शेख जहीर राज, अमिन कादरी, मुजीब शेख, शेख ईस्माइल, शेख रूस्तुम, गजानन रूद्रवार यांच्यासह रहिवाशांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# वृत्तपत्र विक्रेता संघाच्या राज्य अधिवेशन पूर्वतयारीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
येथील शासकीय विश्रामगृहात महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. सदरील बैठकीत महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अधिवेशनाच्या नियोजनाबाबत आढावा घेण्यात आला.
यावेळी बालाजी पवार यांनी हिंगोलीत होणारे अधिवेशन संत नामदेव महाराज यांच्या भुमीत होत आहे. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना ही राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांची एकमेव शिखर संघटना असून यासाठी राज्यभरातून मुंबई विभाग, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, पुर्व व पश्चिम विदर्भ, मराठवाड्यातील जिल्ह्यातील वृत्तपत्र विक्रेते बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहातील अशी अपेक्षा आहे. हिंगोली येथे होणारे मराठवाड्यातील दुसरे अधिवेशन आहे. पहिले अधिवेशन २००६ ला नांदेड येथे झाले होते. तेंव्हा हेही अधिवेशन यशस्वी होणार यात शंका नाही. जसं नामदेव महाराज यांनी वारकरी संप्रदायाची पताका महाराष्ट्र पासून पंजाब प्रांतापर्यंत पोहचवली तसं आपल्याला या अधिवेशनापासून वृत्तपत्र विक्रेता बांधवांना मेहनतीचे फळ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायचे आहे. तेंव्हा सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी बांधवांनी ताकदीने कामाला लागले पाहिजे असे यावेळी सांगितले.
सुरूवातीला आजपर्यंत झालेल्या कामाचा आढावा उपाध्यक्ष संदीप पाचमासे यांनी यांनी मांडला. तसेच जिल्हा अध्यक्ष राजेंद्र हलवाई यांनी दररोज होणाऱ्या बैठका त्यामध्ये कशाप्रकारे तयारी चालू आहे त्याची माहिती दिली. नांदेड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, बांबू जल्देवार, परभणीचे राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्यकारीणी सदस्य किरण क्षीरसागर, मनोज कटकुरी यांनी सुध्दा आपले अनुभव व काही सुचना केल्या.

# उगम ग्रामीण विकास संस्थतर्फे बाल आरोग्य मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
देसाई फाउंडेशन आणि उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कुरुंदा, चोंढी, शिरड शहापूर व कोळसा येथे बाल आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला.



यामध्ये विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून आरोग्य विषयी माहिती देण्यात आली. यामध्ये सापसीडी, रिंग फेकणे, आहाराचे वर्गीकरण, सकस आहार, पोषक थाळी, माझ्या ताटात काय? जोड्या लावा, एक टप्पा असे विविध खेळ घेण्यात आले या खेळांच्या माध्यमातून आरोग्य आणि शिक्षण यांचा सहसंबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आला. तसेच सर्व विद्यार्थ्यां आरोग्य तपासणी करण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासून त्यांना आवश्यक सप्लीमेंट्स देण्यात आले. विजेते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात आले. याकार्यक्रमध्ये जवळपास ४५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बेलमोडे (मुख्याध्यापक कुरुंदा), बारसे (मुख्याध्यापक चोंढी), काळे (मुख्याध्यापक शिरड शहापूर), बेंगाळ (अध्यक्ष, विद्यशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ) सरकटे (कोळसा), कायदा तथा परिविक्षा अधिकारी अनुराधा पंडित, सामाजिक कार्यकर्ता राम प्रसाद मुडे, माजी उपशिक्षणाधिकारी तानाजी भोसले, श्याम संगेवार, चिमणाजी दळवी, संचालक दिशांत पाईकराव, सुशिला पाईकराव, कार्यक्रम व्यवस्थापक विकास कांबळे सिद्धार्थ निनुले, बुद्धभूषण पातोडे, डॉ. संदीप घुगे, डॉ. ऋतुजा घुगे, ओमकार भालेराव, गोविंद अंभोरे व स्वयंसेवक व आरोग्य अधिकारी व कर्मचारी कर्मचारी उपस्थित होते.



**हिंगोली– ओमप्रकाश देवडा पिपल्स को. ऑप. बँकेत नव्याने रूजू झालेल्या लिपिकांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी संचालक मंडळ सदस्य शशीकांत दोडल, मारोतराव बुद्रुक, राजेश अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, महाव्यवस्थापक समता अग्रवाल, उपमहाव्यवस्थापक सुधीर मुळे, सुजीत कुलकर्णी, संजय घोडेकर यांची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### स्थागुशाच्या अवैध धंद्यांवर धाडी



हिंगोली– ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हिंगोली पोलिस दलाच्यावतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्यावतीने विविध ठिकाणी अवैध धंद्यावर धाडी टाकण्यात येत आहेत. स्थागुशाकडून दारूबंदी चे ०५ व जुगाराचे ०२ असे एकूण ०७ कारवाया करण्यात आल्या. त्यामध्ये औंढा नागनाथ पोलिस ठाण्यांतर्गत जुगारा (१२अ)– ९७० रू मुद्देमाल व १आरोपी, बाळापूर– (१२अ)–३३७० रू मुद्देमाल व ५ आरोपी, कुरुंदा (६५ए) १४०० रू, मुद्देमाल व १ आरोपी, कळमनुरी(६५ए) २०७०रू मुद्देमाल व १ आरोपी, हिंगोली शहर(६५ए) ६६९० रू मुद्देमाल व ६०००० किंमतीची गाडी व १ आरोपी, हिंगोली शहर इतर दारू वाहतूक संदर्भाने दोन कार्यवाही करण्यात आली. एकूण दारू व जुगार वर कार्यवाही करून ११ आरोपी व ३,७५,६६५/– लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# शिवाजी महाविद्यालयात नीलानाथ सभागृहाचा नामकरण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचालित शिवाजी महाविद्यालय येथे निलनाथ सभागृहाचा नामकरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.



निलानाथ सभागृहाचे उद्घाटन माजी शिक्षणाधिकारी तथा संस्थापक शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ शिवाजी पवार यांच्या हस्ते करण्यात आले.
यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी संदिप सोनटक्के, संस्थेच्या अध्यक्षा सौ.मंदाताई शिवाजी पवार, सचिव वसंत एकनाथ पवार, कोषाध्यक्ष डॉ. प्रल्हाद शिंदे, सहसचिव इंजि. प्रणव पवार, संस्था सदस्य बाबुराव एकनाथराव पवार, प्रभाकर पारीस्कर, ज्ञानोबा एकनाथराव पवार, ह.भ. प. संभाजी महाराज दुधाळेकर, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक सी.जी.लोंढे, प्राचार्य डॉ.रामदास मुक्टे, मुख्याध्यापक माध्यमिक विभाग रतन भोपळे, प्राथमिक विभाग संतोष क्षीरसागर, कनिष्ठ विभाग शिक्षक पर्यवेक्षक प्रा. देवानंद येवले आदींची प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रामदास मुकटे यांनी केले. या समारंभात शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के यांनी मार्गदर्शन करताना म्हटले प्रत्येक शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांवर माता पित्याच्या सेवेचे संस्कार रुजवावेत जेणेकरून भावी पिढी मातृ पितृ सेवक बनेल. सूत्रसंचालन प्रा.धाराशिव शिराळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. सुनील कांबळे यांनी मानले. संस्थेचे पदाधिकारी शिक्षक व प्राध्यापक वृंद यांच्या उपस्थितीत समारंभ संपन्न झाला.

# ३१ डिसेंबरला पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल कॅरिअर सेंटर हिंगोली व शककर्ता शालिवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंढा नागनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी औंढा नागनाथ येथील शककर्ता शालिवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.
या रोजगार मेळाव्यात क्वेस कॉर्प पुणे, धुत ट्रान्समिशन प्रा. लि. छत्रपती संभाजीनगर, स्काय प्लेसमेंट प्रा. लि. छत्रपती संभाजीनगर, ओमसाई मॅनपावर सर्व्हिस प्रा. लि. छत्रपती संभाजीनगर, संकल्प जॉब प्लेसमेंट प्रा. लि. हिंगोली, बंसल क्लासेस हिंगोली, स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. छत्रपती संभाजीनगर, भारत फायनान्स हिंगोली, स्वतंत्र मायक्रो फायनान्स हिंगोली, भारतीय जीवन विमा निगम हिंगोली, राजयोग मेडीमार्ट हिंगोली, युवा परिवर्तन मुंबई, चैतन्या इंडिया फिन क्रेडिट प्रा. लि. हिंगोली यासह महाराष्ट्रातील नामांकित कंपन्या सहभाग घेणार आहेत. तसेच जिल्ह्यातील शासनाच्या विविध महामंडळांचे स्टॉलही या रोजगार मेळाव्यात लावण्यात येणार आहेत.
या मेळाव्यासाठी दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदवीधर उमेदवारांसाठी शैक्षणिक पात्रतेनुसार ३०० हून अधिक रिक्त पदे उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार पदांची खात्री करून खाजगी क्षेत्रातील नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज करावा.
तसेच अर्ज केलेल्या उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता स्वखर्चाने शककर्ता शालिवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंढा नागनाथ येथे उपस्थित रहावे. रोजगार मेळाव्याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालय, हिंगोली येथे दूरध्वनी क्रमांक ०२४५६–२२४५७४ वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त बा. सु. मरे यांनी केले आहे.

# विज्ञान प्रदर्शनात शांताबाई दराडे विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती मार्फत आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे नुकतेच पार पडले. विविध गटातून हिंगोली तालुक्यामधून एकूण ११ पैकी ५ प्रयोग एकट्या शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाचे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवडले गेले. यामध्ये इयत्ता सहावी ते बारावी गटात देवेश कांबळे आणि समर्थ चुकेवार यांनी तयार केलेला स्मार्ट हेल्मेट या प्रयोगाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे त्यांना विज्ञान अध्यापक संजय सिंह गहेरवार यांचे मार्गदर्शन लाभले. तर समर्थ पडोळे व वरद घुगे यांनी तयार केलेला बँक सेक्युरिटी सिस्टीम हा प्रयोग दिव्यांग गटातून प्रथम क्रमांकाने जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी निवडला गेला आहे. या प्रयोगासाठी विज्ञान अध्यापिका सुप्रिया यरमळ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राथमिक गटातून गणित अध्यापिका चंचल नाईक यांनी तयार केलेले कोण आणि कोणाचे प्रकार हे



शैक्षणिक साधन प्रथम क्रमांकाने निवडले गेले आहे. माध्यमिक गटातून गणित अध्यापक राजकुमार बांगर यांनी तयार केलेले आलेख संबंधीचे शैक्षणिक साधन प्रथम क्रमांकाने निवडलेले आहे. तर प्रयोगशाळा सहाय्यक गजानन बांगर यांचा मानवी शरीर योजना हा प्रयोग प्रयोगशाळा सहाय्यक गटातून प्रथम क्रमांकाने निवडला आहे. या प्रयोगासाठी विद्यार्थिनी मंगल गव्हाळे यांची मदत लाभली. सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच गणित व विज्ञान अध्यापक यांचा शिक्षणाधिकारी माध्यमिक संदीपकुमार सोनटक्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्याला पर्यवेक्षक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे, उपमुख्याध्यापक दत्तराज डोईफोडे, सर्व अध्यापक वृंद व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलनअध्यापक संजय कुलकर्णी यांनी केले. भारतीय विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, सर्व संचालक, शाळेचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व अध्यापक यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये साने गुरूजी जयंती, राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु) नांदेड येथे थोर समाजसेवक, लेखक आणि बालमित्र साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते साने गुरुजी व रामनुजन यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी साने गुरुजी आणि रामानुजन यांच्या जीवनकार्यावर आधारित विचार मांडले.
मृदुला लामतुरे, ईशान चव्हाण, अथर्व गायकवाड या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून साने गुरुजींच्या त्यागमय जीवनाचे आणि त्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व प्रभावीपणे उलगडले. त्यांना साथ दिली शाळेतील सहशिक्षक श्री. अरविंद काळेवार यांनी, ज्यांनी आपल्या भाषणातून साने गुरुजींच्या 'शुद्ध अंतःकरण' या तत्त्वज्ञानाचा आजच्या शिक्षणपद्धतीत कसा उपयोग होतो, हे स्पष्ट केले.
कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अरविंद काळेवार यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, मुख्याध्यापिका सौ क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखले, तसेच समन्वय सल्लागार केदार शर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# पाणी पुरवठ्याची योजना मंजुर होत नाही तो पर्यंत खुर्चीवर बसणार नाही : नगराध्यक्ष कुलकर्णी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २९ डिसेंबर-**

तत्कालीन माजी नगराध्यक्ष सौ.मैथिली कुलकर्णी यांच्या कार्यकाळात बिलोली शहरवासीयांसाठी पाणीपुरवठ्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता तो प्रस्ताव सध्यस्थितीत मंत्रालयात असुन जो पर्यंत तहानलेल्या बिलोलीकरांसाठी पाणी पुरवठ्याची योजना मंजुर होत नाही तो पर्यंत मी नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसणार नसल्याचा संकल्प नवनिर्वाचित नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी पदभार स्विकारताना केला आहे. त्यामुळे बिलोलीकरांना दिलेल्या वचनाची पुर्तता होणार हे निश्चित मानले जात आहे.




बिलोली नगरपरिषद सार्वत्रिक निवडकीत मराठवाडा जनहित पार्टी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संतोष कुलकर्णी व त्यांच्याच पक्षाचे १४ नगरसेवक निवडुन आल्याने संतोष कुलकर्णी यांची एकहाती सत्ता आली आहे.त्याचबरोबर नगरपरिषदेत काँग्रेसचे ४,राष्ट्रवादी १,अपक्ष १ असे पक्षिय बलाबल आहे.२९ डिसेंबर रोजी मुख्याधिकारी बालाजी मिट्टेवाड यांच्या उपस्थिती नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्विकारला परंतु पदभार स्विकारल्यानंतर नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसणार नसल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ते म्हणाले की, बिलोली शहरासाठी पाणीपुरवठ्याची योजना प्रस्थावित असुन ही योजना मंत्रालयात आहे, जो पर्यंत ही योजना मंजुर होणार नाही तो पर्यंत मी नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसणार नाही, लवकरच ही योजना मंजुर करण्यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेतली असुन राष्ट्रवादी, शिवसेनासह विविध सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांची भेटु घेणार असुन शहर विकासासाठी निधीची आवश्यकता असुन त्यामुळे सर्व नेत्यांना भेटने सहाजिक आहे.माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी ही योजना मंजुर करण्यासाठी सहकार्याची भावना दर्शविली आहे.आज झालेल्या पदग्रहण सोहळ्यात नवनिर्वाचित गटनेता नागनाथ तुम्मोड,नगरसेविका सौ.मैथिली कुलकर्णी, नगरसेवक यशवंत गादगे, अनुप अंकुशकर, मिर्झा वसीम बेग, नितीन देशमुख, अब्दुल फिरदोस, सौ.गोदावरी पुपलवार, सौ.अम्रपाली पोवाडे, सौ.अनुपमा महेंद्र गायकवाड, सौ.डॉ.स्वाती शंकपाळे, सौ. लता शिंदे,अपसरी बेगम सादीक पटेल, राजु कुडके, शिवा गायकवाड आदी नगरसेवकांचा नगरपरिषदेकडुन सन्मान करण्यात आला.

**अपक्ष नगरसेवकाचा नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांना बिनशर्त पाठिंबा**

शहरातील देशमुखनगर प्रभागातून निवडून आलेले अपक्ष नगरसेवक शिवाजी गायकवाड यांनी पदग्रहण सोहळ्यानंतर पत्रकार परिषदेमध्ये नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या मराठवाडा जनहित पार्टी प्रणित शहर विकास आघाडीला बिनशर्त पाठिंबा दिला. सत्ताधारी आघाडीचे संख्याबळ आता पंधरा झाले आहे.

# उमरी नगरपरिषद निवडणूक ; आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी !

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २९ डिसेंबर-**

नुकत्याच पार पडलेल्या उमरी नगरपरिषद निवडणुकीत आर्य वैश्य समाजातील दोन उमेदवारांना आपल्या 'भाऊबंदकी'चा फटका बसल्याने, दोन जागा गमवाव्या लागल्याची ओरड सध्या उमरी शहरात याच समाजातून होतेय. परिणामी सध्याच्या नगर परिषदेत आर्य वैश्य समाजाचा एकही व्यक्ती प्रतिनिधित्व करण्यासाठी पोहोचू शकलेला नाही.




उमरी नगर परिषदेचा जुन्या काळापासूनचा इतिहास पाहता नागनाथ तम्मेवार, विजयकुमार उत्तरवार, सुभाष उत्तरवार आदींनी वेगवेगळ्या पक्षाच्या माध्यमातून नगराध्यक्षपदावर आपली मांड ठोकली होती. नागनाथ कोटगिरे यांनी वीस वर्ष, तर नरसिंग चीटमलवार आणि गणेश तम्मेवार यांनीही उपाध्यक्ष पद भूषवले. विशेष म्हणजे दीपालीताई मामीडवार यांनी पाच वेळा नगर परिषदेत प्रतिनिधित्व केले. २ सौ सरिता राम येरावार यांनीही अडीच वर्षासाठी अध्यक्षपद आपल्या ताब्यात ठेवले होते. हा इतिहास पाहता, या नगर परिषदेत प्रत्येकवेळी आर्य वैश्य समाजाच्या कोणत्या ना कोणत्यातरी लोक प्रतिनिधीने समाजाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. पण यंदा म्हणजेच २१ डिसेंबर २५ रोजी या नगर परिषदेसाठी झालेल्या निवडणुकीत आर्य वैश्य समाजाच्या एकाही प्रतिनिधीस निर्वाचित होऊन सभागृह गाठता आलेले नाही.

## आर्यवैश्यांनीच आपल्या समाज बांधवांशी दगाफटका केल्याची समाजातूनच होतेय ओरड

उमरी शहरच नव्हे,तर तालुक्यातील कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीत अधिकतर गोरठेकर गटाचेच प्राबल्य असते. यंदाही उमरीकरांनी तोच कित्ता गिरविला. पण या वेळेचे वैशिष्ट्य थोडे वेगळे ठरले. यावेळी नगर परिषदेत गोरठेकर गट फक्त एक जागा हरला,ती म्हणजे प्रभाग क्रमांक पाच (ब). या जागेवर गोरठेकर गटातर्फे सौ. जयश्री अनिल नगनूरवार या उमेदवार होत्या. सौ. जयश्री यांचे पती अनिल नगनूरवार हे या शहरातील तसेच आर्य वैश्य समाजातील व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रातील प्रथितयश नाव! कोणाच्याही अडीअडचणीत धावून जाण्यासाठी सदैव तत्पर असणारे असे व्यक्तिमत्त्व म्हणून अनिल नगनूरवार यांची परिचितांमध्ये प्रतिमा आहे. असे असताना आणि त्या प्रभागांमध्ये आर्य वैश्य समाजाची अधिकतर मते असताना, मुख्य म्हणजे गोरठेकर गटाची उमेदवारी लाभलेल्या सौ. जयश्री अनिल नगनूरवार यांचा केवळ १७ मतांनी पराभव व्हावा ही बाब समाजबांधवांच्या दृष्टीने लाजिरवाणी ठरली आहे. या प्रभागात भाजपातर्फे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांच्या कन्या सौ. सायली कुलकर्णी यांचा जो निसटता विजय झाला, त्यास आर्य वैश्य समाजातीलच काही विघ्नसंतोषी व्यक्तींनी जाणीवपूर्वक हातभार लावल्याची चर्चा या समाजातील बांधव करीत आहेत.

दुसरीकडे प्रभाग सात ब मधून याच समाजाचे किशोर पबितवार (भाजपा उमेदवार) यांनाही पराभवाचा सामना करावा लागला आहे. आर्य वैश्य समाजातील या दोन्ही उमेदवारांच्या अनपेक्षितरित्या झालेल्या पराभवास समाज महासभेतील राजकारणाची किनार असल्याचेही स्पष्टपणे बोलले जाते. महासभेच्या जिल्हा कार्यकारिणीवर या तालुक्यातून तीन सदस्यांसाठी संधी देण्यात आली होती. या निवडीच्या वेळी आपापसातील हेव्या-दाव्यांमुळे उघड एकमत न झाल्याने, चिठ्ठी पद्धतीने प्रतिनिधींची नावे निश्चित करण्यात आली होती. यात काही तथाकथित स्वयंघोषित नेत्यांची वर्णी न लागल्याने, त्या गोष्टीचा वचपा काढण्यासाठी या असंतुष्ट मंडळींनी या दोन जागी दगा फटका करत, आमची माती करणारी आमची माणसं अशी भूमिका वठवली. पण त्यांच्या या आत्मघातकीवृत्तीने या वेळच्या नगर परिषदेतून संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व हद्दपार झाले.

सामाजिक राजकारणात सातत्यपूर्ण प्राबल्य ठेवावयाचे असल्यास, सामाजिक अर्थात जातीय समीकरणे योग्य पद्धतीने हाताळणे फार महत्त्वाचे असते. म्हणूनच एकंदरीत परिस्थितीचा विचार करता, गोरठेकर श्रेष्ठींकडून सौ. जयश्री नगनूरवार, अनिल नगनूरवार किंवा अन्य एका समाज बांधवास निश्चितपणे स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त करून सामाजिक समतोल राखला जाईल अशी आशा आर्य वैश्य समाजबांधव आणि त्यांच्या सामान्य कार्यकर्त्यांना आहे.



## नवनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार

**देगलूर** -येथील प्रभाग क्रमांक अकरा मधील मोहम्मद आदिल मित्र परिवार आणि सय्यद निसार भाई मित्र मंडळ, देगलूर यांच्या वतीने नवनियुक्त नगराध्यक्ष, नगरसेवक आणि प्रतिनिधी यांचे स्वागत करण्यात आले. तसेच भावी शुभेच्छा देण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजी टेकाळे, नगरसेवक नंदुसेठ शाखावार, नगरसेवक अनिल बोन्लावार, नगरसेवक पाशा भाई शेख, नगरसेवक प्रतिनिधी शुभम लक्ष्मीकांत पदमवार, नगरसेवक प्रतिनिधी सुमित कांबळे, नगरसेवक प्रतिनिधी सय्यद अजिज भाई, शशिकांत टेकाळे, माधव फुलारी, पिंटु जोशी आणि इतर मान्यवरांचे नगरपरिषदेत मिळालेल्या विजयाबद्दल हा सन्मान करण्यात आला आहे. याप्रसंगी नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजी टेकाळे म्हणाले, आपण सर्वांनी माझी सौभाग्यवती विजयमाला बालाजी टेकाळे आणि माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाला ज्या विश्वासाने विजयी केलात त्या विश्वासाला कधीच तडा जाऊ देणार नाही. आपल्या सर्वांच्या अडीअडचणीत आणि सुखदुःखात टेकाळे परीवार सदैव राहील. देगलूरचा विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असंही त्यांनी सांगितलं.

## साहेबराव गजभारे यांना पीएच.डी.प्रदान



**नवीन नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र विषयातील पत्रकारिता व जनसंवाद या विषयात मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचार विषयक बातम्या:एक संवादशास्त्रीय अभ्यास या विषयावर विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. हा शोध प्रबंध डॉ.प्रा. राजेंद्र गोणारकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. साहेबराव गजभारे यांच्या या यशाबद्दल मित्र परिवार यांच्या कडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या मौखिक परिक्षेचे बहिष्त परिक्षिका डॉ. प्रा.रेखा शेळके (एम.जी.एम. पत्रकारिता संचालिका संभाजी नगर)यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर,प्रा. डॉ. सुहास पाठक, डॉ. प्रशांत घोडवाडीकर, डॉ. भास्कर भोसले,विशाल बोरगावकर, डॉ. आनंद घोवडवाडीकर,प्रिती घोवडवाडीकर,गजानन इंगोले, बाबू जंकलोड,प्रकाश तारु, मारोती भोसले, शेख नजीर,भारती मॅडम,कंधारकर,कानिंदे, मनोहर सोनकांबळे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन

**नांदेड**-ग्राहकांचे हक्क व ग्राहक संरक्षण कायद्याबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यंदाही शुक्रवार २ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे दुपारी १ वाजता करण्यात आले आहे.सर्व ग्राहक व नागरिकांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# युतीच्या प्रश्नावरून संभ्रम; उमेदवारी अर्ज मंद गतीने दाखल

**भा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २९ डिसेंबर-**

नांदेड जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दिनांक २९ डिसेंबर रोजी निवडणूक कार्यालय सिडको येथे प्रभाग क्रमांक १९ व २० मधून २७ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे यांनी दिली.

सिडको हडको नवीन नांदेड भागातील प्रभाग क्रमांक १९ व प्रभाग क्रमांक २० मधील एकूण पाच नगरसेवकांच्या जागेसाठी दिनांक २९ डिसेंबर रोजी सोमवारी तीन वाजेपर्यंत प्रभाग क्रमांक १९ मधून १६ व प्रभाग क्रमांक २० मधून ११ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आज रोजी पर्यंत अर्ज विक्री ही ३९५ एवढी झाली असून अर्ज दाखल मात्र २७ एवढी झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे यांनी दिली आहे. उमेदवारी नामनिर्देशन पत्र तपासणी साठी प्रभाग क्रमांक २० साठी दोन टेबल वरून नाम निर्देशन पत्र तपासल्या जात असत असून प्रभाग क्रमांक २० साठी देखील दोन टेबल वरून तपासले जात आहेत व नंतर नामनिर्देशन पत्राची प्राथमिक तपासणी टेबल एक एक वरून झाल्याने अंतिम तपासणी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षेत करण्यात येत आहे.

नामनिर्देशन पत्रात कुठलेही तुरटी राहू नये याची दक्षता पुरेपूर निवडणूक आयोगाने घेतल असल्याचे दिसून येते.पक्षाच्या युतीचा प्रश्न मार्गी लागला नसल्यामुळे सर्व उमेदवारांमध्ये संभ्रमाची अवस्था निर्माण झाली असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यास विलंब होत असल्याचे चित्र दिसून येते.

# सिध्दापुरे कुटुंबियाना देशमुख परीवारांकडुन मदतीचा आधार

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २९ डिसेंबर-**

सगरोळी येथील अल्पभुधारक शेतकरी सिध्दापुरे कुटुंबाच्या कौलारू घराला विजेच्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत घर जळुन खाक झाल्याने उघड्यावर पडलेल्या त्या पिडीत कुटुंबाची संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी संस्थेचे संचालक रोहीत देशमुख यानी भेट घेऊन अर्थिक मदतीचा आधार देऊन धिर दिल्याने गावकऱ्यांकडुन कौतुक होत आहे.

सगरोळी येथे गेल्या काही दिवसापूर्वी विजेच्या शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीच्या भडक्यात अल्पभुधारक शेतकरी हाणमंत दिगंबर सिद्धापुरे यांचे घर त्या आगीत जळुन खाक झाल्याने दागदागिने, नगदी रोकड, अन्नधान्य, कपडे यासह संसार उपयोगी वस्तु जळुन खाक झाले व अन्य काही कुटुंबाच्या घराचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यात जवळपास २५ लाखाचे



नुकसान झाल्याचा अंदाज होता. सर्वाधिक नुकसानीचा फटका हाणमंत सिध्दापुरे यांच्या कुटुंबास बसला आसुन उघड्यावर पडलेल्या त्या पिडीत कुटुंबांची भेट गेल्या अनेक दशका पासुन संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात झेप घेत आसताना या पलीकडे सामाजिक क्षेत्रात गगन भरारी घेताना वेगवेगळ्या संकटात सापडलेल्या गोरगरीबांच्या मदतीसाठी धाव घेणारे सगरोळीचे छत्र म्हणून विविध भागातील हजारो कुटुंबाचे आधारस्तभ म्हणुन ज्यांचे सर्वत्र नावलौकीक आहे. त्या सगरोळी येथील देशमुख परीवाराच्या वतीने रोहीत देशमुख संचालक संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी यानी उघडयावर पडलेल्या त्या पिडीत कुटुंबाची दि. २८ डिसेंबर रोजी भेट घेऊन ४५ हजार रुपयाचा धनादेश देऊन यापुढे ही त्या शोकाकुल कुटुंबास मदत करण्याचे अश्वासन देत धिर दिला. यावेळी सिध्दापुरे कुटुंबानी समाधान व्यक्त करत दानशुर देशमुख परीवारांचे आभार मानले. तर शासनाकडुन अद्याप ही मदत मिळाली नसल्याने जनतेतुन संतप्तजनक भावना व्यक्त होत आहे. यावेळी दतु कोटनोड, श्रीनिवास दमय्यावार, वैभव भोसले, भगवान सिध्दापुरे, मनोहर देगलरे, सतीश बुच्छलवार, चुन्नमवार संजय, माणिक लोकडे याच्यासह आनेकांची उपस्थिती होती.

## रमेश गजभारे यांचे निधन



**नायगाव**- नायगांव तालुक्यातील घुंगराळा येथील रहिवासी रमेश गणपत गजभारे हे वयाच्या ५७ व्या वर्षी अल्पशा आजाराने सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी दुखद निधन झाले. ते घुंगराळा ग्रामपंचा- यत कार्यालयात सेवक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी आज सायंकाळी बौद्ध स्मशा नभूमी, घुंगराळा येथे झाला आहे.

# महानिरीक्षक ख्वाजा सजनुद्दीन यांच्या हस्ते हर्बल पार्कचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २९ डिसेंबर-**

दि.२९ डिसेंबर रोजी, मुदखेड येथील केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालय (सीटीसी) परिसरात पोलीस महानिरीक्षक प्राचार्य ख्वाजा सजनुद्दीन यांच्या हस्ते नव्याने बांधलेल्या हर्बल पार्कचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी वेद प्रकाश त्रिपाठी, सीएमसी, संदीप चौहान, डीएफओ, नांदेड, सीएपी कॅम्पसमधील अधिकारी, इतर अधिकारी आणि त्यांचे कुटुंब उपस्थित होते.

उद्घाटन समारंभाला संबोधित करताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की हर्बल पार्क ही सध्याच्या काळाची एक महत्त्वाची गरज आहे. यामुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेलच, शिवाय आयुर्वेदिक आणि औषधी वनस्पतींचे महत्त्वही जनतेला कळेल. त्यांनी सांगितले की औषधी वनस्पती आपल्या प्राचीन भारतीय वैद्यकीय व्यवस्थेची एक अमूल्य संपत्ती आहेत आणि अशी उद्याने नवीन पिढीला निसर्गाशी जोडण्याचे एक शक्तिशाली माध्यम ठरतात.

या हर्बल पार्कमध्ये तुळशी, अश्वगंधा, गिलॉय, कोरफड, कडुनिंब, आवळा, ब्राह्मी, अर्जुन आणि इतर अनेक औषधी आणि सुगंधी वनस्पती लावण्यात आल्या आहेत. प्रत्येक वनस्पतीच्या शेजारी प्रत्येक वनस्पतीचे औषधी गुणधर्म आणि उपयोग याबद्दल माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे, ज्यामुळे जनतेला आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदे मिळतात.

या उद्यानात हिरवळ, चालण्याचे मार्ग, पुरेशी बसण्याची व्यवस्था आणि शांत वातावरण आहे, ज्यामुळे योग, ध्यान आणि निसर्गोपचारात रस असलेल्यांसाठी ते एक उपयुक्त ठिकाण बनले आहे. हे हर्बल पार्क आरोग्य जागरूकता, जैवविविधता संवर्धन आणि स्वच्छ वातावरणासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

या हर्बल पार्कच्या स्थापनेत सक्रिय सहकार्य केल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांनी डीएफओ नांदेड आणि इतर वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानले.

कार्यक्रमादरम्यान, पाहुण्यांनी वृक्षारोपण केले आणि पर्यावरणाचे रक्षण आणि औषधी वनस्पतींना प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचा संदेश दिला. शेवटी, आयोजकांनी सर्व पाहुण्यांचे आणि नागरिकांचे आभार मानले आणि हर्बल पार्क स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्याचे आवाहन केले.



**नांदेड- मनपा निवडणूकीच्या अनुषंगाने आज काँग्रेसची भुमिका खासदार रविंद्र चव्हाण यांनी पत्रकार परीषदेत स्पष्ट केली.**

# स्व. संतोष टाक यांच्या कुटुंबियांना मित्र परिवारांनी केली ५१ हजाराची मदत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २९ डिसेंबर-**

मुदखेड येथील रहिवासी आणि सोनार कारागीर स्व.संतोष टाक यांचा १६ डिसेंबर २०२५ रोजी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परखाली दुर्दैवी मृत्यू झाला होता. या हृदयद्रावक घटनेमुळे मुदखेड परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. या



कठीण प्रसंगी टाक कुटुंबाला आर्थिक आणि मानसिक आधार देण्यासाठी त्यांच्या शालेय मित्रपरिवाराने मदतीचा हात पुढे केला आहे. महात्मा गांधी विद्यालय, मुदखेड येथील १९८६ च्या १० वी बॅचमधील वर्गमित्रांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकी जपली आहे. आपल्या दिवंगत मित्राच्या कुटुंबाला सावरण्यासाठी या मित्रपरिवाराने ५१,००० हजार रुपयांचा मदत निधी गोळा करून टाक कुटुंबाकडे सुपूर्द केला. या उपक्रमात समाजसेवक तथा माजी नगरसेवक कैलास विश्वनाथराव गोडसे, किशोर शेवाळे, धनंजय मामीडवार, निळकंठ पेडोळे, सुभाष चौदंते, संजय वटमवार, श्रीकृष्ण देशमुख आणि लक्ष्मणराव शहाने यांच्यासह १९८६ बॅचच्या सर्व मित्रांनी सक्रीय सहभाग नोंदवला. या मदतीमुळे टाक कुटुंबाला मोठा आधार मिळाला असून, शालेय मित्रांनी जपलेल्या या मैत्रीचे आणि संवेदनशीलतेचे शहरात कौतुक होत आहे.

